*मौलिक विचार माला . २३*

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजांचा

# योग-विचार



** श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ दहीसाथ अमरावती*

**डॉ. कृष्ण माधव घटाटे*

रु.१०





## श्रीगुलाबरावमहाराज : जीवनकार्य

(इ.स.१८८१ ते १९१५)

''युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे''

प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबरावमहाराज म्हणजे विदर्भातील माधानचे गुलाब गुंडोजी मोहोड. चवथ्या महिन्यात नेत्रहीन, माधान-खेड्यातील जीवन, शिक्षणाचा अभाव आणि आयुष्य केवळ ३४ वर्षे ! अशी सर्वतः विपरीत परिस्थिती असूनही महाराजांनी केलेल्या ग्रंथलेखनरूप ज्ञानयज्ञाचे कार्य अजोड आहे.

श्रीमहाराजांची श्रीकृष्णाचे ठिकाणी माधुर्यभक्ती असल्यामुळे ते स्वतःला ज्ञानेश्वरकन्या आणि कृष्णपत्नी म्हणवीत.

श्रीमहाराजांनी ''श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत संप्रदाय'' प्रवृत्त केला.हा नाथसंप्रदाय असून उपास्यत्वेकरून वारकरी पंथाची शाखा आहे.

संतांची ज्ञानोत्तर पराभक्ती आणि शंकराचार्यांचा अद्वैत वेदान्त यांचा समन्वय करून शास्त्रीय खंडनमंडन पद्धतीने भक्तिशास्त्राची नवीन स्वरूपात मांडणी केली.

भगवंताचा सगुण विग्रह मिथ्या नसून सच्चिदानंदघन शुद्ध ब्रह्मस्वरूप आहे.तो ज्ञानानेही नाश पावत नाही, यासाठी अगदी नवीन शब्दयोजना सुचवून शंकराचार्यांच्या अद्वैतात





'अनध्यस्तविवर्त' या भक्ति-संकल्पनेचे नवे योगदान दिले.

जगातील सर्व धर्मांत आणि हिंदुसमाजातील विभिन्न घटकात परस्पर द्वेष वाढू नये म्हणून महाराजांनी समर्थ असा सर्वधर्मसमन्वयाचा मूलगामी सिद्धान्त जगापुढे मांडला. आणि आर्य-अनार्य, आर्य-दस्यु, आर्य-द्रविड, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, उत्तर-दक्षिण, इत्यादि द्वेषभावनेला आणि त्यामुळे उत्पन्न झालेल्या असंतोषाला मूठमाती देण्यासाठी समन्वयरूपी प्रभावी हत्यार विचारवंतांच्या हाती दिले.०००

## श्रीगुलाबरावमहाराज : सर्वस्पर्शी प्रज्ञा

१ वेद-द्रष्टा : वेदमंत्राना हृदयात पहाणारे
० वेद-श्रोता : योगसाधनेत वेदमंत्र ऐकणारे
० वेद-मीमांसक : विरोधपरिहार करून सुसंगती लावणारे
२ सूत्रकार ऋषी : ९ सूत्रग्रंथ
३ षड्दर्शनांवरील भाष्यकार
४ भक्त्याचार्य : भक्तिशास्त्र-निर्माते
५ ज्ञानेश्वरमधुराद्वैतदर्शन-निर्माते
६ धर्माचार्य : धर्माचे सर्वांगीण स्वरूप उकलून दाखविणारे
७ पुराणाचार्य : समन्वयदृष्टीचे सूत्ररचनाकार
८ सांख्यदर्शनाचार्य : ६ ग्रंथ
९ योगदर्शनाचार्य : १० ग्रंथ
१० न्यायदर्शनाचार्य : ग्रंथ
११ पूर्वमीमांसाचार्य : संकल्पना - स्पष्टीकरण २ ग्रंथ
१२ आयुर्वेदाचार्य : ८ ग्रंथ
१३ संगीताचार्य : २ ग्रंथ
१४ नवीनवृत्त-रचनाकार
१५ छंदरचनाकार
१६ विविध विषयावरील ग्रंथकार
१७ कीर्तनकार : आख्यानरचना-१८
१८ लोकगीतकार : तुंबडी,सयनाजी,स्त्रीगीते इ.
१९ लावणीकार





२० नाटककार
२१ आत्मचरित्रकार
२२ समन्वयमहर्षी : धर्मसमन्वय-दर्शनसमन्वय-शास्त्रसमन्वय-
२३ काव्यशास्त्रनिर्माते
२४ नवीन भाषानिर्माते : नावंग भाषा
२५ नावंग भाषेचे व्याकरणनिर्माते
२६ नवीन लिपी निर्माते
२७ क्रीडा निर्माते : परमार्थ-प्रक्रिया : मोक्षपट
२८ विज्ञानाला नवी दृष्टी देणारे
२९ मानसशास्त्राला नवी दृष्टी देणारे
३० इतिहासाला नवी दृष्टी देणारे
३१ चमत्कारांचा निषेध करणारे
३२ नीतिशास्त्रज्ञ : पाश्चात्य व भारतीय तुलना
३३ कवी व गायक
३४ लोक-शिक्षक
३५ स्त्री-शिक्षक
३६ बाल-शिक्षक
३७ अभंग - २१५२
३८ संगीतपदे-२२४४ **(संस्कृत ४१)**
३९ श्लोक-१००० **(संस्कृत-मराठी)**
४० ओव्या-२३०००च्या वर
४१ गद्यपद्य पत्रे ११८ - **(संस्कृत ११)**
४२ ग्रंथरचना १३१ **संस्कृत-३१रचना** मराठी-वऱ्हाडी-हिंदी-व्रजभाषेतून हिंदी-३ रचना एकूण पृष्ठे-७०००

---

**ग्रंथोपलब्धी :**

*** ज्ञानेश्वरसंस्थान दहीसाथ अमरावती.**

*** ज्ञानेश्वरसंस्थान पाताळेश्वर रोड महाल नागपूर**

---

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजांचा

# योग-विचार

**योगदर्शन** :- भारतीय वैदिक षड्दर्शनांपैकी सांख्य-दर्शनाला योग हे पूरक दर्शन आहे. सांख्यानुसार साधकाने आत्मानात्मविवेक केल्यानंतर आत्मतत्त्वाचा साक्षात्कार करून घेण्यासाठी साधकाला योगाचा आश्रय घ्यावा लागतो. सांख्यातील विचाराने आत्मा कोणता व अनात्मा कोणता, हे समजल्यावर आत्म्याचा अनुभव येण्यासाठी योगातील साधनांच्या प्रक्रिया प्रत्यक्ष आचराव्या लागतात. म्हणूनच सांख्य-योगाची जोडी म्हटल्या जाते. सांख्यातील पंचवीस तत्त्वांमध्ये सव्वीसावा ईश्वर मिळविला की योगदर्शन तयार होते.

या योगशास्त्रावर महाराजांनी एकूण आठ ग्रंथ लिहिले आहेत. योगप्रभाव (१.गद्य २.ओवीबद्ध), निदिध्यासनप्रकाश, ध्यानयोगदिवाकर, हिरण्ययोग, योगांगयमलक्षण, कुंडलिनी-जगदंबा व सोपानसिद्धी हे आठ ग्रंथ केवळ योगविषयक असून साधुबोध, संप्रदायसुरतरू, व ताईंना११पत्रे यात योगासंबंधी नवीन माहिती आणि





योगातील अनेक नवीन प्रक्रिया महाराजांनी रचलेल्या आहेत.

अनेक ठिकाणी योगविषयक चर्चा करून आधुनिक मतांचे खंडन करून कोणाचीही भीड न धरता योगाचे शास्त्रशुद्ध स्वरूप महाराजांनी अभ्यासकांपुढे मांडले आहे. त्या सर्वांच्या आधाराने महाराजांनी केलेल्या मूलगामी आणि सूक्ष्म संशोधनाचा आपण येथे थोडक्यात आढावा घेऊ.

**भगवान् पतंजली**

श्रीगुलाबराव महाराजांनी योगशास्त्राचे आचार्य भगवान् पतंजली मुनींना सर्वतोपरी प्रमाण म्हणून स्वीकारले आहे. या बाबतीत आधुनिक विद्वान मात्र बराच संशय व्यक्त करतांना आढळतात. परंतु महाराजांना मात्र योगसूत्रकार पतंजलिमुनी हे अनंत शेषनागाचा अवतार म्हणून मान्य आहेत. भगवान् शेषांनीच पतंजलीरूपाने अवतार घेऊन योगशास्त्राची सूत्रबद्ध मांडणी केली; असे ते स्पष्ट म्हणतात. इतरत्रही जे शेषाचे अवतार म्हणून प्रसिद्ध आहेत ते सर्व परमग्राह्य म्हणून महाराजांनी ग्रहण केलेलेच आहेत आणि त्या सर्व अवतारांत **दोषापनयनाचे कार्य** समान आहे, अशी सुसूत्रता दाखवून दिली आहे.





**१. आयुर्वेद** : भगवान् शेषाने चरकाचार्यांचा अवतार घेऊन वैद्यकशास्त्रात चरकसंहिता निर्माण केली व '**शरीराची शुद्धी करण्याचा**' म्हणजेच रोग-निवारणाचा उपाय लोकांना दाखविला.

**२. व्याकरण** : व्याकरणातील पतंजलींचे महाभाष्य अत्यंत प्रसिद्ध आहे. ते पतंजली व योगसूत्रकार पतंजली एकच होते. व्याकरणावर ग्रंथ लिहून त्यांनी जीवाचे '**वाचेचे दोष**' नाहीसे केले.[१]

**३.सेवा** : लक्ष्मणाचा अवतार घेऊन भगवान् शेषाने प्रभू रामचंद्राची सेवा केली. हीन समजला जाणारा सेवाधर्म भगवंताकडे लावल्यानंतर कसा सर्वश्रेष्ठ परमार्थ प्राप्त करून देतो हेच जणुं या लक्ष्मणावतारात दाखवून सेवाधर्मातील हिणकसपणा घालवून दिला.

तसेच 'बंधु म्हणजे बंधन करणारा भाऊ' किंवा 'संसाराच्या बंधनात पाडणारे ते बांधव' वगैरे अर्थातील बंधनरूपी दोष लक्ष्मणाने निवारण केला व विशुद्ध बंधुप्रेमाचा आणि दास्यभक्तीचा परम आदर्श लक्ष्मणाच्या रूपाने भगवान् शेषानेच घालून दिला.





**४. नीती** : कृष्णावतारात बलराम होऊन नीतिशास्त्राची रचना केली.[२] माघ कवीच्या शिशुपालवध या काव्यात यासंबंधी फारच उत्कृष्ट चित्रण आले आहे. नीतिशास्त्रामुळे राजनीतीतील व सामान्य व्यवहारातील मलिन व कुटिल नीतीला कसे घालवून द्यावे व **धर्माच्या अविरोधी सन्नीतीचे** पालन कसे करावे, याचे उत्तम मार्गदर्शन बलरामांनी केले.

**५. योग** : पतंजलींचा अवतार घेऊन भगवान शेषांनीच योगाच्या साह्याने **मनाचे दोष** नाहीसे करण्याचा मार्ग सुस्पष्टरीतीने प्रगट केला. तेच हे योगदर्शन होय. मर्त्य अशा पांचभौतिक देहाच्या साह्याने परमेश्वरप्राप्ती कशी करून घ्यावी, हेच या योगदर्शनाने अज्ञानी जीवांना शिकविले.

अशाप्रकारे योग, वैद्यक, व्याकरण, नीती; दास्य व बंधुप्रेम यातील मनुष्यांचे मनोदोष, शरीरदोष, वाणीदोष वगैरे दूर करण्यासाठी भगवान् शेषांनीच निरनिराळे अवतार घेतले असे पुराणादिकांत मांडलेले मत महाराजांनी पूर्णपणे शिरोधार्य म्हणून स्वीकारले आहे. हे येथे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

योगेन चित्तस्य पदेन वाचा मलं शरीरस्य च वैद्यकेन ।
योऽपाकरोत्तं प्रवरं मुनीनां पतंजलिं प्राञ्जलिमानतोऽस्मि ॥

**समाधिपाद आधी कां?**

योगशास्त्रात समाधिपाद आधी आहे आणि नंतर साधनपाद आहे. उलट गीतेच्या सहाव्या अध्यायात आधी साधन सांगितले आहे आणि नंतर समाधी सांगितली आहे. वर वर पाहिले असता यात परस्पर विरोध आहे असे सर्वांनाच वाटते, परंतु महाराजांनी या विरोधाभासाचा समन्वय अगदी सहज रीतीने केलेला आहे.

अर्थक्रमाप्रमाणे पाहिले असता आधी साधन व नंतर फलरूप समाधी हाच क्रम बरोबर आहे. गीता ही भगवद्‌वाणी असल्यामुळे योगशास्त्राला मूळ सूत्ररूप आहे. आणि पतंजलींच्या सूत्रावरील भाष्यकारांनी देखील आधी साधन करून मग फल मिळवावे हाच क्रम स्वीकारला आहे. असे असताना पतंजलींनी आधी समाधिपाद कां सांगितला याचे मार्मिक कारण महाराजांनी सांगितले आहे-

**समाधिपादाहून । जो समाधि साधू शके आपण ।**
**त्यासाठी नाही निरूपण । साधनादींचे ॥३॥**





'नुसते मन स्थिर केले तरी कार्य होते' म्हणूनच मन स्थिर करण्याचे हजारो उपाय समाधिपादात सांगितले आहेत.[४] त्यामुळे समाधिपाद सुरवातीला ठेवला आहे.

एकाग्र भूमिकेच्या जवळ ज्याचे चित्त गेले आहे त्याने समाधिपादावरून अभ्यास करावा आणि ज्याचे चित्त चंचल आहे त्याने साधनपादावरून अभ्यास करावा, असे योगप्रभावात महाराज स्पष्टीकरण करतात.

ज्याला अत्यंत कडक वैराग्य आहे, ज्याचे मन विषयाकडे धावतच नाही अशा एकाग्र भूमिकेच्या जवळ गेलेल्या साधकाने केवळ मन स्थिर केले तरी तो समाधिसंपन्न होतो. अशा उत्तम अधिकाऱ्यासाठी शास्त्राचा पूर्ण विस्तार सांगण्याची गरज नसते. त्याने केवळ समाधिपादाचे श्रवण करावे. त्यातील एखादी गुरूपदिष्ट प्रक्रिया आपल्या योग्यतेप्रमाणे घ्यावी आणि केवळ चित्ताच्या एकाग्रतेच्या साह्याने कृतार्थ व्हावे असे सूत्रकारांचे मनोगत आहे.

पण जो साधक विषयासक्त आहे त्याने साधन-पादावरून यमनियमादी अष्टांग योगाचा अगदी सुरवातीपासून अभ्यास करावा आणि क्रमाक्रमाने आपली





उन्नती करून घ्यावी व शेवटी समाधीपर्यंत पोहचावे अशी या शास्त्राची व्यवस्था आहे. केवळ शास्त्राचा अभ्यास करावयाचा असल्यास समाधिपादच आधी समजावून घ्यावा. कारण असे की,

**''आत्मा वा रे द्रष्टव्यः श्रोतव्यः मन्तव्यः निदिध्यासितव्यः''**

अशी श्रुती आहे. यात 'द्रष्टव्य' हे पद प्रथम आहे. आणि नंतर श्रवण, मनन, निदिध्यासन असा क्रम सांगितला आहे. जसे, झाडाचा आंबा कसा आहे ते आधी पहावे. नंतर वृक्षावर चढण्याचे वगैरे श्रम करून तो प्राप्त करून घ्यावा. त्याचप्रमाणे साधकाने प्रथम आपल्याला काय मिळवून घ्यावयाचे आहे ते समाधिपादावरून समजून घ्यावे. नंतर साधने करावीत आणि शेवटी समाधिरूपी फल प्राप्त करून घ्यावे. यासाठी योगशास्त्रात प्रथम समाधिपाद व नंतर साधनपाद असा पाठक्रम आहे.'**कानामात्राचिये भेटी, जो स्वरूपचि होईजे किरीटी**' या ओवीत सांगितलेल्या उत्तम साधकाला ''सर्वांगाचे श्रवण (कान) करून केवळ अवधान दे'' असे ज्ञानेश्वरमहाराजही सांगतात. '**एकले अवधान देईजे । मग सर्व सुखासी पात्र होईजे**' या सर्वांवरून असा निष्कर्ष निघतो की, '**शब्द सुनाय संदेह मिटावत**' शब्द





ऐकताच ब्रह्मरूप होणाऱ्या उत्तमाधिकाऱ्यांसाठी समाधिपाद आधी आहे. आणि इतरांसाठी मात्र साधनपादावरूनच प्रथम अभ्यास करावा अशी शास्त्रकारांनी व्यवस्था करून दिली आहे. याप्रमाणे **गीतेतील अर्थक्रम** आणि **योगसूत्रातील पाठक्रम** याचा समन्वय करून महाराजांनी त्यातील विरोधाभासाचा निरास केला आहे.

**योगाचा अधिकार**

'**अथ योगानुशासनम्**' या पहिल्या योगसूत्रात, 'अथ' हा शब्द मंगलाकारक असून आरंभवाचक' आहे. आनंतर्यवाचक नाही.

ज्या शास्त्रात 'अथ' शब्द आनंतर्यवाचक असतो तेथे त्या शास्त्राचा अधिकारी पूर्वीच साधनसंपन्न असला पाहिजे अशी अपेक्षा असते. जसे वेदपठनाचा अधिकारी यज्ञोपवीत संस्कार झालेली व्यक्ती अपेक्षित आहे किंवा वेदांताचा अधिकारी साधनचतुष्टयसंपन्न असावा लागतो; तसे इथे योगशास्त्राला अभिप्रेत नाही.

या ठिकाणी 'अथ' शब्द आरंभवाचक आहे. विशेष अधिकार प्राप्त झाल्यावरच योग करावा असा विशेष अर्थ 'अथ' चा कोणी समजू नये, तर ''**प्रत्येकास आपापल्या**

**अवस्थेत थोडाबहुत योग करता येतोच**'' असा त्याचा अर्थ आहे. पण सोबतच अभ्यासाचे व वैराग्याचे पाठबळ त्याच नियमाने वाढवीत गेले पाहिजे.[५] असे महाराजांचे स्पष्ट मत आहे. अगदी मूढ दशेतील पुरुषही योगासाठी सद्‌गुरूला शरण जाऊ शकतो. जसे वैद्यकशास्त्रात शिष्याची तयारी करून घेण्याची जबाबदारी गुरूचीच असते. त्याप्रमाणे योगात यम नियम हे देखील शिक्षणात घातले असल्यामुळे ते कसे शिकवावे ही जबाबदारी गुरूचीच असते. सांगून जर शिष्य ऐकणार नाही तर मात्र कोणत्याच शास्त्रात गुरूवर जबाबदारी नाही.[६]

**परोक्षविवेक अपरवैराग्य । शमादिषडंग मुमुक्षाभाग्य ।**
**हे अधिकारियाप्रती योग-। साधनचतुष्टय बोलिले ॥१७५॥७**

यातील 'मोक्षाची इच्छा आणि स्वतःहून अभ्यास करणे या दोनच गोष्टी साधकाकडे आहेत.' आणि वैराग्यादी कसे प्राप्त करून घ्यावेत, हे शिकविण्याची सर्व जबाबदारी गुरूची आहे. म्हणून महाराज म्हणतात की '**जो योगाची इच्छा करील तो योगाचा अधिकारी**' म्हणूनच ज्याला ब्रह्मरूप होण्यासाठी योगाची इच्छा असेल त्याने





- ० कसोशीने प्रयत्न करावा.
- ० गुरुवचनावर दृढ निष्ठा ठेवावी आणि
- **० शास्त्रप्रतीती, गुरुप्रतीती व स्वप्रतीती** यांचा मेळ घालावा.
- ० विषयासक्ती सोडावी.
- ० मानसविषयांना जिंकावे. यातील तारतम्य जाणावे.
- ० विहित विषयांची समता ठेवावी आणि हळूहळू विषयदोषदर्शनाने विषय दूर सारावे.

असे जो करतो तोच योगशिखरावर जाऊन पोचतो.[८] **अनुभवलेल्या संसारक्लेशापुढे अभ्यासाचे व मृत्यूचे भय ज्याला मुळीच वाटत नाही तोच योगाचा अधिकारी !** म्हणूनच ज्ञानेश्वर माउली म्हणते, **'योगासारिखे सोपे । काही आहे?'** पण साधना करताना एक पथ्य मात्र कडक रीतीने पाळलेच पाहिजे -

**वैराग्य अपरिहार्य**

वीतरागतेसारिखा । जोडूनि ठेविला सखा ।
तो आघवियाचि भूमिका । सवे चाले ॥१०४३-१८ज्ञा.





० ज्याच्याजवळ विषयांची विरक्ती नाही त्याने चुकून देखील योगपंथाचा आश्रय करून नये.

० अविरक्ताने योगाभ्यास करणे म्हणजे उद्याचे मरण आजच आणणे होय.

० अविरक्ताच्या अल्पशुद्ध अन्तःकरणात जो जो भाव मनात उठतो त्या त्या भावाप्रमाणे तो तात्काळ भलभलत्या योनीत जाऊन पडतो. यासंबंधी जडभरतांचे उदाहरण प्रसिद्ध आहे. पण 'जडभरत' ज्ञानसंपन्न असल्याने हरिण जन्मातही त्यांचा योग नाहीसा झाला नाही.[९] परंतु इतरांना संसारात आघात होऊन वाईट गती झाल्याशिवाय राहत नाही.[११]

अहो उत्तम अन्नाचे अजीर्ण । कवणाते नाणी मरण । तैसे कामबुद्धी योगाचरण । ते नरकी पतन याचि जन्मी ॥१०॥

**एक रहस्य : ३ प्रतीती**

वैराग्याच्या आणि स्वतःच्या प्रयत्नांच्या बळावर जो योगाभ्यास करण्याची इच्छा करतो त्याने एक रहस्य चित्तात कोरून ठेवावे;

स्वयंप्रतीतिःस्वगुरुप्रतीतिःशास्त्रप्रतीतिःमनसश्च निरोधः।





दिनेदिने यस्य भवेत्स योगो सर्वेषु सुसंमतोऽभूत् ॥

**१. शास्त्रप्रत्यय** म्हणजे शास्त्रात सांगितलेला सामान्य मार्ग.

**२. गुरुप्रत्यय** म्हणजे शिष्याच्या अधिकारा-नुसार शास्त्रातून गुरूने आखून दिलेला मार्ग.

**३. आत्मप्रत्यय** म्हणजे आपल्या प्रयत्नानुसार आपल्याला आलेला चित्तरोधाचा अनुभव. आणि-

**०. स्वानुभवाचा पुनः गुरुशास्त्रांशी पडलेला मेळ.**[१२]

या तीन प्रतीतींच्या साह्याने योगाभ्यास करणारा समाधी प्राप्त करून घेतो, असा सिद्धान्त महाराजांनी सांगितला आहे. या तिन्ही गोष्टी एकत्रितपणे जमल्या तर शास्त्राविषयी व गुरुविषयी योग्याच्या मनात यत्किंचितही अनादर उत्पन्नच होऊ शकत नाही.

परंतु हे योगाचे रहस्य लक्षात न घेतल्यामुळे आधुनिक योगी म्हणविणाऱ्यामध्ये **''गुरुशास्त्रांविषयीचा अनादर व स्वतःच्याच अनुभवाचा उदो उदो''** वगैरे मानसिक विकृती वाढलेल्या आढळून येतात. पारंपारिक विचारांची एकवाक्यता ते करू शकत नाहीत आणि शेवटी याचा विपरीत

परिणाम म्हणजे साधकांची दिशाभूल होते, फसगत होते आणि आपल्या पारमार्थिक परंपरेची टिंगलही झालेली दिसून येते. अतएव वरील तीन बाबी मनात पक्क्या बिंबवून घेऊन नंतरच साधकांनी योगमार्गाचा अवलंब करावा.

**योग सोपा : भक्ती कठीण**

शारीरिक कष्टांच्या भीतीमुळे भक्ती सोपी व योग कठीण आहे असा बऱ्याच लोकांचा समज आहे. पण 'योगासारिखे सोपे काही आहे?' असे माउलीच्या म्हणण्याप्रमाणे भक्त्यादी वस्तुतंत्र मानसभावापेक्षा स्थूल कर्तृतंत्र योग खरोखरीच सोपा आहे. असे महाराजांचेही मत आहे.[१३]

दिंडी - **जया अंगी वैराग्य पूर्ण झाले ।**
**विवेकाने निश्चीत चित्त केले ॥**
**असो कोणीही उंच नीच जाती ।**
**परी योगी अधिकार तया देती ॥** (पदगाथा १५३१)

विवेक, वैराग्य व अभ्यास यांची सांगड घालणारा असला की तो कोणत्याही जातीचा असो त्याला योगाचा पूर्ण अधिकार आहे, असे या पदात महाराज सुचवितात.





या सर्व विवेचनाचा मथितार्थ येवढाच की योगाभ्यास करण्याची इच्छा करणाऱ्याने आपल्याजवळ योग्यता आहे की नाही याचा विचार सोडून द्यावा. वैराग्यादी साधनसंपन्न होण्याचा कसोशीने तीव्र प्रयत्न करावा. अभ्यास करताना मृत्यूचे भय मनातून निःशेष घालवून द्यावे आणि गुरुआज्ञेवर अत्यंत दृढ निष्ठा ठेवून ईश्वर प्रणिधानासह सतत अभ्यास करीत राहावे. आपणा आहे की नाही योग्यता । ही शुभकर्मी न करावी चिंता । दुर्गतीस जाय कल्याण करिता । हे सर्वथा घडेना ॥[१५]

**कुंडलिनी, चक्रे, नाडी : गैरसमज**

कुंडलिनी, षट्चक्रे, सुषुम्ना नाडी वगैरे संबंधी लोकमानसात बरेच समज-गैरसमज प्रचलित आहेत. त्या सर्वांचा निरास करणारे प्रतिपादन महाराजांच्या वाङ्मयात आढळते. त्यांचे वास्तविक स्वरूप काय आहे ते महाराजांनी सोप्या रीतीने मांडले आहे.

इंग्रजीमध्ये ज्याला फ्लेक्सस् म्हणतात त्याला अलीकडेच योगी चक्रे म्हणतात, हे महाराजांना पसंत नाही. एका आधुनिक पुस्तककाराने तर लार्जबॉवेलला (आंतडीला)





कुंडलिनी म्हटले आहे. परंतु लार्जबॉवेल जर कुंडलिनी होईल तर ती वर चढवावी कशी, हा प्रश्न पडतो. ती जर मस्तकात चढेल तर बिचाऱ्या योग्याला समाधी ऐवजी मृत्यूसच वरावे लागेल[१६]

वस्तुतः चक्रांची स्थिती वेगळी आहे. मनाची भावना झाली की शरीरात न कळता विकार उत्पन्न होतो... शरीरात असणाऱ्या गुप्त गोष्टी मनाच्या भावनेने प्रगट होतात. त्याचप्रमाणे चक्रे, कुंडलिनी वगैरे मनाच्या तीव्र भावनेनेच शरीरात प्रगट होऊ लागतात व नंतर त्यांचे प्रकार व परिणाम शरीरावर प्रत्यक्ष दिसू लागतात.

वस्तूच्या विरोधी जर या भावना असतील तरच त्यांना खोटे म्हणता येईल. पण वस्तुप्रमाणे भावना करणे ही काही खोटी कल्पना नव्हे. गुप्त वस्तू शब्दप्रमाणाने सुचविल्या जातात व नंतर भावनेने त्या प्रगट होतात. त्याप्रमाणे योगशास्त्र प्रथम चक्रे व कुंडलिनी वगैरे सांगते व नंतर ती योग्याच्या भावनेने शरीरात प्रगट होतात. म्हणून गुरुवाक्यानुसार भावनाच करावी. - अलीकडचे योगी शारीरिक चक्रांना अवयवांची जी नावे ठेवतात ते मात्र योग्य नाही. महाराज म्हणतात तसे करणे हेच खरोखर भावनाजनक आणि प्रमाणाभास आहे.





**मनोमय नाड्या**

योगप्रभावात महाराज म्हणतात की मनाच्या चित्तवाहिनी असलेल्या नाड्या मनाप्रमाणेच शस्त्राने तुटत नाहीत. प्रेताबरोबर जळत नाहीत कारण त्या मांसमय नाहीत. वैकुंठ, कैलास, यमलोक किंवा पुनर्जन्मादी सर्व लोकालोकातील गमनागमन या नाड्यांच्याच साह्याने जीवाला करावे लागते.[१७]

विषय जाणताना किंवा भोगताना मन शरीराच्या बाहेर निघते तेव्हा ते साऱ्या शरीरभर पसरून, सर्व इंद्रियातून निघून, सर्व विषयांकडे एकदम जात नाही. नाकातून बाहेर निघाले तर त्वचेकडे नसते. एका वेळी एकच विषय भोगला जातो. म्हणूनच मनाला जाण्यायेण्यासाठी नळ्या आहेत असे दिसते. यांनाच मनाच्या चित्तवाहिनी नाड्या म्हणतात. या नाड्यांचीच षट्चक्रे, कुंडलिनी वगैरे बनलेले आहेत. ती योगदृष्टीनेच दिसतात, चिरून अगर कापून दिसत नाहीत.

या मनोमय नाड्यांनी बनलेले आठ पाकळ्यांचे कमळ हृदयात आहे. त्यात मनाचे सर्व पदर म्हणजे शक्ती

आहेत. या मनाच्या सर्व शक्ती एकाग्रतेने लक्षात येतात. स्थूल दृष्टीने लक्षात येऊ शकत नाहीत.

**षट्चक्रे**

ही योगशास्त्रातील **सहा कमळे**(चक्रे) **शास्त्रकल्पित असून भावनेने प्रगट होतात**. म्हणून योगशास्त्रात 'स्थूलारुंधती' न्यायाप्रमाणे प्रथम स्थूल कमलाची भावना करण्यास सांगितली आहे. हे आठ पाकळ्यांचे कमळ छाती व पोटाच्या मध्ये असून त्याचे तोंड खाली असून देठ वर आहे. रेचक प्रणायामाने त्याचे खाली असलेले मुख वर करावे आणि त्यावर बुद्धीची धारणा करावी, असे सांगितले आहे.[१८]

**कुंडलिनी**

कुंडलिनी याच नाड्यांनी बनलेली सर्पासारखी वेटोळी घातलेली आहे. ती निद्रिस्थ असून तिला चालना देऊन जागृत करावे लागते. अशी ही कुंडलिनी सर्व योगाची मूल शक्ती आहे.[१९]

० ब्रह्मवेत्ते वेदांती '**शुद्धबुद्धी**' म्हणून हिचे स्तवन करतात.
० मांत्रिक '**अलौकिक शक्ती**' म्हणतात.





० सिद्ध पुरुष '**अलोट बुद्धी**' म्हणतात. आणि
० योगी हिलाच प्रणवरूप ओंकाराची जन्मदात्री '**कुंडलिनी**' शक्ती म्हणतात.
० कुंडलाकार म्हणजे वर्तुळाकार हिचे शयन आहे म्हणून ही **ओंकार**रूपी आहे. हीच **चैतन्यशक्ती** आहे. चैतन्य व्यक्त होण्याला उपाधी लागत असते म्हणून नाडीची उपाधी घेऊन या शक्तीला कुंडलिनी म्हटले जाते. कुंडलिनी जगदंबा या ओवीबद्ध ग्रंथात महाराज म्हणतात - **ती ही जाणिजे कुंडलिनी । महाशक्ती ॥२५॥ व्यष्टी देहात कुंडलिनी सर्पिणी । विराट देहात कुंडलिनी सहस्त्रफणी । पावावया ब्रह्मस्थानी । मध्यस्थ ही कुंडलिनी ॥३३॥**(य१५)

योगवार्तिककार म्हणतात - सुषुम्नानाडीचे मूळही याच ठिकाणी आहे. ब्रह्मांडाच्या बाहेर निघून हिनेच चंद्रसूर्याला व्यापिले आहे. सर्व विश्वाला *(गुरुत्वाकर्षणरूपाने)* हिचाच आश्रय आहे. हीच मनोवाहिनी नाडी आहे. हिच्याच द्वाराने मन लोक-परलोकात गमनागमन करीत असते. योगी देखील हिच्याच साह्याने समाधीत जाऊन मोक्ष मिळवितात. ही योगाशिवाय दिसत नाही.[२०]





व्यष्टिदेहातील कुंडलिनी आणि विराट ब्रह्मांडातील सहस्त्रफणी एकच असून चैतन्यमय आहे. चैतन्यमय असल्यामुळेच मांसमय जड नाही. शरीराची चीरफाड करून कुंडलिनी, चक्रे, वगैरे कधीही दृश्य होऊ शकत नाहीत. योसाधना करताना भावनेमुळे ते शरीरात व्यक्त होऊन त्यांची शक्ती प्रतीत होऊ लागते.

याप्रमाणे या सर्वांचे यथार्थ स्वरूप महाराजांनी अनेक ठिकाणी स्पष्ट दाखवून दिले असून पाश्चात्य दुर्विदग्ध मतांचे निराकरण करून साधकांना सुयोग्य मार्गदर्शन केलेले आहे.

**हठयोग व राजयोग**

सामान्यपणे अध्यात्माची आवड असलेल्या लोकात राजयोगाबद्दल श्रेष्ठबुद्धी आणि हठयोगाबद्दल तुच्छबुद्धी पहावयास मिळते. परंतु महाराजांनी दोहोतील भेद व्यवस्थितपणे उकलून दाखवून ते परस्पर पूरक कसे आहेत, याचे विवेचन केले आहे.[२१] वैराग्य मात्र दोन्ही ठिकाणी अत्यंत आवश्यक आहे.

**'वैराग्याशिवाय राजयोगही करू नये**





**किंवा हठयोगाच्या फंदातही पडू नये''**

असे महाराजांच्या विवेचनावरून दिसते. हठयोगात नियम, आसने व प्राणायाम यांचे द्वारा वैराग्य आणि चित्तनिरोध साधावयाचा असतो. राजयोगात नुसते वैराग्य असले तरी चालते पण ते कडकडीत असावे लागते. आधुनिक पारमार्थिकांना वैराग्याशिवाय राजयोग हवा असतो म्हणून त्यांचे प्रयत्न सफल न होता विफल होतात. वैराग्यबोधक उपदेशाकडे दुर्लक्ष केले तर समाधीपर्यंत कोणीही जाऊं शकत नाही. असो.

मानसिक भाग राजयोगातील असून शरीरप्रधान भाग हठयोगात अन्तर्भूत आहे. **यम, प्रत्याहार, धारणा, ध्यान** ही अंगे राजयोगात येतात.- **नियम, आसने, प्राणायाम** ही अंगे हठयोगात अन्तर्भूत होतात. परंतु यातील कांही अंगे राजयोग व हठयोग या दोहोतही सारखीच आहेत. तरीही हठयोगाची समाप्ती राजयोगात होते हे स्पष्ट आहे.

**० केवलं राजयोगाय हठविद्योपदिश्यते'। (गोरक्षसंहिता)**
**० मनो यत्र विलीयते पवनस्तत्र लीयते । पवनो लीयते यत्र मनस्तत्र विलीयते ॥ हठयोगप्रदीपिका.**

ज्याला वैराग्यादिक कडकडीत असून इंद्रियच्युती होण्याची भीती नाही त्याने राजयोगापासून आरंभ केल्यास चालेल.

योगवासिष्ठात-'राजयोग करणाऱ्याने किंचित हठयोग केला पाहिजे व हठयोग करणाऱ्याला शेवटी राजयोग करावाच लागतो,' असे म्हटले आहे. सर्व योगप्रक्रियेत राजयोग श्रेष्ठ असून त्याकरता हठयोगाची आवश्यकता आहे; असा गोरक्षनाथादी योगशास्त्रकारांचा आग्रह आहे.[२२]

देहादी नियामक तामसद्रव्यशक्ती, आवरण-प्राण-इंद्रिय-चलनादी राजस क्रियाशक्ती व विक्षेप यांचा निरोध करणे हठयोगात अन्तर्भूत आहे आणि केवळ ज्ञानशक्तीचा (म्ह.सत्त्वाचा) संस्कारशेषाचा निरोध राजयोगात येतो.

''**ज्ञानवृत्ती राजयोगे । प्राणायामासने हठे ।**''

वैराग्य व अभ्यासाच्या योगानेच हा सर्व प्रकारचा, अभ्यासावाचून नुसते वैराग्य असलेला पहिल्यापेक्षा उत्तम असला तरी प्रवृत्तिनिरोधाच्या बाबतीत अज्ञ असल्यामुळे मरेपर्यंत त्याला त्रासच होत असतो. म्हणून हठयोग व राजयोगाच्या समुच्चयानेच चित्तवृत्तींचा निरोध साध्य आहे





असा सर्व प्राचीन योगशास्त्रज्ञांचे सांगणे आहे.

**योगशास्त्राच्या पायऱ्या**

१) नियमातील **वेदांतश्रवणाने** तामसशक्तीचा निरोध.
२) यमासहित इतर **नियमांनी** इंद्रियशक्तींचा निरोध.
३) **आसनाने** अवयव-स्थैर्य येते.
४) **प्राणायामाने** सर्व चलनशक्तींचा निरोध होतो व चित्ताची मूढावस्था संपते.
५) **प्रत्याहाराने** क्षिप्त अवस्थेचा निरोध.
६) **धारणेने** व **ध्यानाने** विक्षिप्त अवस्थेचा निरोध.
७) **संप्रज्ञात समाधीत** मन एकाग्र होते. शेवटी -
८) **निर्विकल्प समाधीत** निरुद्धावस्था प्राप्त होते.

हा संपूर्ण योगशास्त्राचा थोडक्यात क्रम आहे. परंतु यात तयारी अतिशयच पाहिजे. मृत्यूच्या भीतीचा तर निःशेष त्याग केला पाहिजे.[२३]

याप्रमाणे हठयोग व राजयोग हे दोन्ही परस्पर पूरक आहेत. हठयोगानंतरची पायरी राजयोग आहे. म्हणून त्यापैकी एक ग्राह्य व दुसरा अग्राह्य असे मात्र समजता कामा नये. हेच महाराजांनी सविस्तर दाखवून दिले आहे.





'मन स्थिर होत नाही' येवढ्या सबबीवर राजयोगाचाच अभ्यास करावा असे वाटणे साहजिक आहे, परंतु राजयोगात देखील स्वतःच्याच प्रयत्नांनी मनाला स्थिर करावे लागते. ते आपोआप स्थिर होत नाही. आपल्या प्रयत्नाने ''मनाचा निरोध मुळीच न करता कोणता तरी वेगळा उपाय शोधणे'', हे योगशास्त्राला संमत नाही.[२४] आता ध्यानाचा विचार करू-

**ध्यानाला स्वतंत्र योगत्व**

ध्यान हे अष्टांग-योगातील सातवे अंग आहे.[२५] तरीसुद्धा भगवद्गीतेत **'ध्यानेन आत्मनि पश्यन्ति'** असे म्हटले आहे. याचा अर्थ योगाशिवाय केवळ ध्यानमार्गानेही आत्मदर्शन होऊ शकते असा आहे.

महाभारतात शांतिपर्वातील मोक्षधर्मात भीष्मांनी ध्यानयोगाचा उपदेश केला आहे. अष्टांगयोगाहून भिन्न मार्ग म्हणून ध्यानाचे हे वेगळे विवेचन आहे.

'**प्रच्छर्दनविधारणाभ्यां वा प्राणस्य**' या योगसूत्रात प्राणायामाला विकल्प सांगितला आहे. म्हणून ध्यान करताना प्राणायाम केलाच पाहिजे असा नियम नाही. अतएव ध्यान करताना योगाचे सर्वच अंग आचरिले पाहिजेत, असे नसून





ध्यानाला 'स्वतंत्र योगत्व' आहे. तसेच '**यथा अभिमतध्यानाद् वा इति**'। या समाधिपादातील योगसूत्रात ध्यानाला 'विकल्प' सांगितला आहे. म्हणून आसनप्राणायामादिकांनी समुचित ध्यानच केले पाहिजे असा आग्रह सूत्रकारांचा नाही.[२६] पतंजली, भीष्माचार्य आणि भगवान् श्रीकृष्ण या तिघांनीही ध्यानाचा स्वतंत्र मार्ग म्हणूनही अंगीकार केला आहे. असे तिघांचे प्रामाण्य देऊन महाराजांनी **'ध्यानयोगदिवाकर'** हा ध्यानमार्गावर सहा अध्यायांचा ग्रंथ लिहून ध्यानाच्या नवीन नवीन प्रक्रिया वेगवेगळ्या अधिकाऱ्यांसाठी सांगितल्या आहेत.

**स्वप्न योग**

समाधिपादातील '**स्वप्न-निद्रा-ज्ञानालंबनं वा**' या योगसूत्रानुसार स्वप्नापासून योगसिद्धी म्हणजे परमेश्वरप्राप्ती कशी करून घ्यावी यासंबंधी विवेचन आहे. महाराजांनी या स्वप्नयोगावरच '**हिरण्ययोग**' नावाचा चार अध्यायांचा ग्रंथ लिहिला आणि 'यथार्थ स्वप्न हे योगोत्पादक कसे करून घ्यावे?' याचे विवेचन केले आहे.

स्वप्नाचे **अपार्थ, अन्यार्थ, सूचक** आणि **यथार्थ** असे चार भेद आहेत. पैकी संतदर्शन, सद्गुरुदर्शन आणि

ईश्वरदर्शन हे यथार्थ स्वप्नांतर्गत येतात. संत, गुरु व ईश्वर यांचे स्वप्नात दर्शन झाले तर ते खोटे मुळीच मानू नये. साधकाने आपले चित्त तेथेच निश्चश्चयपूर्वक लावावे[२७] व त्यांच्या उपदेशाप्रमाणे चालावे म्हणजे परमार्थ साधला जातो. उदा.

१) बुधकौशिकऋषींना भगवान शंकरांनी स्वप्नात रामरक्षा सांगितली व त्यांनी ती लिहून ठेवली.[२८]

२) श्रीतुकारामांना सद्‌गुरु बाबाजींनी स्वप्नात मंत्रोपदेश दिला.

३)मीराबाईना श्रीकृष्णाने स्वप्नात वरले.

असे अनेक यथार्थ स्वप्नांचे दृष्टान्त देऊन त्यानुसार परमेश्वरप्राप्ती कशी करून घ्यावी याचे सांगोपांग विवेचन महाराजांनी केले आहे. या महात्म्या लोकांनी ही स्वप्ने खोटी मानली नाहीत आणि म्हणूनच त्यांचा परमार्थ पूर्ण साधला. शंकराचार्यांनी देखील हा स्वप्नयोग मान्य केलेला आहे.-

**'स्वप्नेऽप्याचार्यमंत्रः श्रवणपरिचितः सत्यमेति प्रबोधे ।**
**स्वप्नादीशप्रसादादभिलषितफलं सत्यतां प्रातरेति ॥'**

तसेच त्यांनी बृहदारण्यक उपनिषदात स्वप्न ही





इहपरलोकाची संधी आहे म्हणून तेथील गुरूपदेश व संतदर्शन हे सत्यच आहेत, असे स्पष्ट सांगितले आहे.[२९]

स्वप्नाचा उपयोग योगासाठी करून घ्यावा, हे सूत्र समाधिपादातील आहे. त्यात स्वप्नाला विकल्प दिला आहे. म्हणून या स्वप्नप्रक्रियेची गणना उत्तम योगातच होते. एकाग्र मन नसलेल्या साधकांसाठी साधन-पादातील प्रक्रिया उपयोगी आहेत आणि ज्याचे चित्त समाहित झाले आहे अशासाठी समाधिपादात नानाविध प्रक्रिया उपदिष्ट आहेत, म्हणूनच स्वप्नयोग हा श्रेष्ठयोगात अन्तर्भूत होतो.[३०]

**स्वप्नेन सत्त्वजन्येन वृत्तिरोधः प्रजायते ॥५॥**
**सत्त्वस्य मध्यसंवेगात् योगत्वं लभते ऽचिरात् ॥६॥**

श्रीमहाराजांच्या 'हिरण्ययोग' ग्रंथात स्वप्नापासून वृत्तिरोध होतो आणि मध्यसंवेगरूपी सत्त्वगुणयुक्त स्वप्नांचा वृत्तिरोधासाठी उपयोग करून घेतला तर योग पूर्ण होतो. यासंबंधी सविस्तर विवेचन आले आहे.

स्वप्नयोगसाधनेसाठी शिथिलांगासन आणि ध्यान बहुतेकांना उपयोगी पडू शकते म्हणून त्यांचा उपयोग करावा.[३१]





१. मृदू संवेगाने म्हणजे ध्यान करून सात्त्विक झालेल्या अन्तःकरणात भगवंताला प्रयत्नपूर्वक आणावे.

२. नंतर मध्यसंवेग करून त्यालाच स्वप्नात पहावे. आणि शेवटी -

३. तीव्रसंवेग करून हृदयात त्याचा साक्षात्कार करून घेऊन योगी व्हावे.

**''मृदुसंवेगे सत्त्वान्तःकरणी ।**
**भावे प्रगटवावां कैवल्यदानी ।**
**तोचि मध्यसंवेगे पाहोनी स्वप्नी ।**
**तीव्रयोगे हृद्‌भुवनी योगी व्हावे ॥१९.१॥''**

असा मनोसंवेगांचा मृदु- मध्य- तीव्र क्रम सांगून महाराजांनी स्वप्नयोगासंबंधी मौलिक मार्गदर्शन केले आहे.

**समाधीचे मूलगामी विवेचन**

संपूर्ण योगदर्शनाचे ध्येय असंप्रज्ञात समाधी साधून घेणे हे आहे. **समाधी म्हणजे 'ध्येय व ध्याता एक होणे'** होय.[३२] हे ऐक्य योगाच्या साह्याने करून घ्यावयाचे असते. योगशास्त्राच्या अनेक ग्रंथांमध्ये संप्रज्ञात व असंप्रज्ञात वगैरे समाधीचे प्रकार विस्ताराने आले आहेत. परंतु महाराजांनी





त्यातील सूक्ष्म भेद आणि नवीन रहस्ये सांगितली आहेत. त्यातील असंप्रज्ञात समाधीचे तीन प्रकार आणि

**'त्वंपदनिष्ठ समाधी'** व **''तत्पदनिष्ठ समाधी''**

हे दोन प्रकार तर अगदी अपूर्व आहेत. तेही आपण पाहू.

संप्रज्ञात समाधी

हिच्यात ध्याता व ध्येय एकरूप होतात पण त्यात ऐक्याची जाणीव कायम राहते. हिलाच सविकल्प किंवा सबीजसमाधी म्हणतात. हिचे चार प्रकार आहेत.

**१) वितर्कसंप्रज्ञात :-** स्थूल पदार्थाशी (तो ईश्वर असो की दुसरा विषय असो) एकरूपता पावणे. हा वितर्क संप्रज्ञात समाधी होय.

**२) विचारसंप्रज्ञात :-** सूक्ष्म वस्तूशी चित्त एक होणे. उदा.फुलाच्या वासाशी एकरूप होणे.

**३) आनंदसंप्रज्ञात :-** रज व तम हे मनोमल निःशेष निघून गेल्यावर सत्त्वाच्या आनंदाशीच एकपणा पावणे.

**४) अस्मिता संप्रज्ञात :-** ब्रह्मानंदता प्राप्त झाल्यावरही 'मी ईश्वर आहे' अशा अहंकाराशी एक होणे (अहंब्रह्मास्मि) पण त्यातही ऐक्याची जाणीव असते.

**असंप्रज्ञात समाधी**

या समाधीत ध्याता व ध्येय एकरूप तर होतातच पण 'एक झालो' ही आठवणही राहत नाही. यात अशी सहजब्रह्मरूपता असते. जाणीवरहित निर्विकल्प ब्रह्मस्थिती हीच होय. ही सर्वश्रेष्ठ कशी आहे हे महाराजांनी सांगितले.

* अपर वैराग्याचे फळ - इंद्रियनिग्रह
* अभ्यासाचे फळ - संप्रज्ञात समाधी
* परवैराग्याचे फळ - असंप्राज्ञात समाधी

योगाचार्य घेरंडमुनींच्या मताप्रमाणे नुसत्या भक्तीनेही असंप्रज्ञात समाधी साधली जाते.[३३] योगाचे अंतिम फल 'असंप्रज्ञात समाधी' हीच आहे, हे दाखविले आहे.

**असंप्रज्ञात समाधीने प्रारब्धनाश**

''प्रारब्धकर्माणां भोगादेव क्षयः'' असे सूत्र आहे. ज्ञान झाल्यानंतर संचित कर्म जळून जाते आणि पुढे होत असलेले क्रियमाण कर्म देखील फलपर्यवसायी होत नाही म्हणजे भोगावे लागत नाही. परंतु प्रारब्ध मात्र भोगलेच पाहिजे, असे ज्ञानामार्गात प्रतिपादित आहे. -

परंतु योगशास्त्राचे मत मात्र याहून वेगळे





असल्याचे महाराज स्पष्ट प्रतिपादन करतात.[३४] परवैराग्याने योगाची असंप्रज्ञात समाधी साधली गेली की सर्व कर्मांचा निःशेष नाश होतो. योगी म्हणतात की 'असंप्रज्ञात समाधीने संचित क्रियामाण व प्रारब्ध हे तिन्ही जळतात आणि योग्यांना स्वेच्छेने वाटेल तेव्हा समाधी घेता येते.' विज्ञानभिक्षू देखील असेच म्हणतात की, 'ज्ञान झाल्यावरही असंप्रज्ञात समाधी करावी म्हणजे प्रारब्ध जिंकता येते.'

**भक्तिशास्त्राप्रमाणे** तर असंप्रज्ञात समाधी अंतर्बाह्य मिळू शकते. सगुणाच्या आत्यंतिक प्रेमामुळे भक्ताची समाधी अखंड साधली जाते आणि त्यामुळे प्रारब्धाचा पूर्ण अभिभव होतो. हृदयातील ब्रह्मानुभवामुळे आणि बाहेर भगवत्प्रेमाच्या अनुभवामुळे भक्तांचे चित्त प्रारब्ध भोगण्यासाठी देहावर येतच नाही, सगुण श्रीहरीचे आलंबन सुटतच नाही. अशा ईश्वरप्रणिधानासह योगाने साधणाऱ्या असंप्रज्ञात समाधीमुळे प्रारब्धाचा देखील नाश होतो. असे महाराजांनी सिद्ध केले आहे.

**असंप्रज्ञात समाधीचे तीन प्रकार**

ही असंप्रज्ञात समाधी ईश्वरप्रणिधानामुळे अतिशय त्वरित मिळते. म्हणून योगशास्त्रात भक्तिसमुच्चित योगाचे





प्रतिपादन केले आहे. योगसूत्रात दोन ठिकाणी ईश्वरप्रणिधान आले आहे. त्यापैकी -

* साधनपादातील ईश्वराप्रणिधानाने संप्रज्ञात समाधी
* समाधिपादातील ईश्वरप्रणिधानाने असंप्रज्ञात समाधी.

त्यातील असंप्रज्ञात समाधी तीन प्रकारची आहे-

**१. आपोआप व्युत्थान पावणारी**

भागवतात श्रीकृष्ण मुचकुंदराजाला म्हणतात की योग-प्राणायामादिकांनी समाधी साधली तरी योगी आपोआप व्युत्थान पावतो. कारण त्याच्या सर्व वासना निरुद्ध असतात. नष्ट झालेल्या नसतात. ''**अक्षीणवासनं राजन् दृश्यते पुनरुत्थितम्**'' वासना शिल्लक असल्यामुळे योग्याचे आपोआप व्युत्थान होते आणि जगद्भ्रम मिथ्यारूपाने पुनः भासू लागतो व प्रारब्धाची सुखदुःखे अत्यल्प प्रमाणात कां होईना, पण भोगली जातात. या ठिकाणी ईश्वरप्रणिधान न करणारा योगी अभिप्रेत आहे. 'गीतासंगती'त महाराज म्हणतात,

**स्वतः समाधीतून । प्रथमेंत पावे व्युत्थान ॥६१॥**

याप्रमाणे आपोआप व्युत्थान पावणारी असंप्रज्ञात समाधी होय. असा पहिला प्रकार महाराजांनी सांगितला आहे.





**२. दुसऱ्याकडून व्युत्थान पावणारी**

योगवासिष्ठात प्रल्हादाचे आख्यान आले आहे. प्रल्हादाला असंप्रज्ञात समाधी साधली होती. त्याचे व्युत्थानच होत नव्हते. तो दहा हजार वर्षे समाधीत बसला होता.त्यामुळे त्याचे असुर प्रजाजन उन्मत्त होऊन देवब्राह्मणांना छळू लागले. ते पाहून भगवान् विष्णूने आपल्या शंखाच्या आवाजाने त्याला समाधीतून उठविले. ही दुसऱ्याकडून व्युत्थान पावणारी समाधी होय. **''द्वितीयेत दुसऱ्याकडोन । व्युत्थान पावे॥६१॥''** गीतासंगती.

**३. व्युत्थानरहित असंप्रज्ञात समाधी**

तृतीयभूमी व्युत्थानरहित । तथापि शिखिध्वजराजवत । नियत्या कदाचित व्युत्थान होत । तरी न मोडत समाधी ॥६२॥

योगवासिष्ठातील शिखिध्वज राजाची समाधी नियतीमुळे व्युत्थान पावली पण त्याचा ब्रह्मानंद मुळीच कमी झाला नाही. वृत्तींचे व्युत्थान झाले म्हणजे वृत्ती स्फुरण पावल्या तरी समाधीत अनुभवाला येणारा ब्रह्मानंद भंग पावला नाही. म्हणजे लोकांना समाधी भंग पावल्यासारखी वाटली तरी शिखिध्वजाच्या दृष्टीने मात्र समाधी अखंडच

होती. ही तिसऱ्या प्रकारची समाधी कधीच खंडित होत नाही.

अधिकाधिक महात्मे जीवन्मुक्त दशेत लीलेने विचरण करतात. अज्ञानी लोकांना परमार्थाचा उपदेश करतात. तरी पण *(लोकांना जाणवणाऱ्या)* त्यांच्या वृत्तींच्या स्फुरणकालीही त्यांची समाधी जशीच्या तशी कायम राहते.

असंप्रज्ञात समाधी शब्दाचा अर्थ ''**ध्यान करणारा आणि ध्येय यांचे जाणीवरहित ऐक्य**'' होणे असा आहे. त्या स्थितीत जीवश्वरभेद संपूर्णपणे नाहीसा झालेला असतो. वृत्तींच्या पुनरुत्थानातही तो भेद पुनः उत्पन्न होत नाही. ही समाधीची स्थिती आधिकारिकांची व ज्ञानोत्तर पराभक्ती करणाऱ्यांचीच अखंड कायम असते. महाराज म्हणतात-

**- एवढा समाधी प्रचंड। भगवद्भक्तीने लाभे अखंड । एवं वदले घेरंड । मुनी ॥६६॥**[३५]

**तक्ता १)** याप्रमाणे योगशास्त्रकार घेरंडाचार्यांचे प्रमाण देऊन महाराजांनी भक्तियुक्त योगशास्त्रातील सूक्ष्म धागेदोरे उकलून दाखविले आहेत.





**(तक्ता १)** **समाधी : ८ प्रकार**

- **काष्ठसमाधी**
  - **संप्रज्ञात**
    - १. वितर्क
    - २. विचार
    - ३. आनंद
    - ४. अस्मिता
  - **असंप्रज्ञात**
    - ५. आपोआप व्युत्थान पावणारी
    - ६. दुसऱ्याकडून व्युत्थान पावणारी
    - ७. व्युत्थानरहित
- **८.सहजसमाधी**
  - * निर्विकल्प
  - * निर्बीज
  - * असंप्रज्ञात
  - *व्युत्थानरहित
  - **८सहजसमाधी**

**त्वंपदनिष्ठ आणि तत्पदनिष्ठ समाधी**

प्रियलीलामहोत्सव या ग्रंथात त्वंपदनिष्ठ आणि तत्पदनिष्ठ असे समाधीचे दोन प्रकार अगदी नव्याने महाराजांनी मांडले आहेत. त्यांचे स्वरूप समजावून घेण्यासारखे आहे.

**त्वंपदनिष्ठतया ''आत्मरूपे'' समाधिः ॥**[३६]
**तत्पदनिष्ठतया प्रेममये ''भगवति'' समाधिः ॥**
**तयोः रक्षणं तु महावाक्यनिष्ठतया कृतम् ।**
**तथापि इच्छाप्रारब्धदोषतः इत्यादिवत् सगुणरूप-तिरोधानं अपश्यन्**





**सन् व्युत्थितोऽस्मि ।**
**तदा तदेव रूपं दिदृक्षुर् अहं पुनः ब्रह्मज्ञानवानपि तैनैव रूपेण आकृष्टचेताः पुनरपि समाधिनिष्ठोऽभवत् ।**
**किंतु तत्पदार्थनिष्ठतया वीक्षमाणो ऽपि रूपदर्शनाभावेन निर्गताशया वैक्लव्यं प्राप्तवान् ॥**

याप्रमाणे श्रीनारद भागवताच्या आरंभी व्यासांना सांगतात. या ठिकाणी महाराजांनी ''त्वंपदनिष्ठसमाधी'' आणि ''तत्पदनिष्ठसमाधी'' असे सूक्ष्म अर्थाचा भेद व्यक्त करणारे दोन नवीन शब्द सुचविले आहेत. त्यामुळे भक्तीची समाधी कशी असते याचे मर्म ग्रहण होण्यासारखे आहे. त्याचा विचार करू.

(**तक्ता - २**)

**१. त्वंपदनिष्ठसमाधि : आत्म-अभिन्न**

योगाभ्यासाने किंवा ज्ञानाभ्यासाने त्वं पदाच्या ठिकाणी म्हणजेच अंतरात्म्याच्या ठिकाणी हृदयात 'आत्म-अभिन्न' समाधी साधली जाते. ही साधताना बाह्य वाटणाऱ्या नामरूपात्मक जगताचा व्यतिरेक करावा लागतो. परंतु या समाधीतून पुनः होणाऱ्या व्युत्थानात- नामरूपांसंबंधीचा मिथ्याभास कायमच राहतो.





**तक्ता -२** **समाधी**

- **(१)त्वंपदनिष्ठ**
  - * आत्म-अभिन्न
  - * आंतर्
  - * निर्गुण
  - * नामरूपरहित
  - * व्यतिरेकाने मिळणारी
  - * व्युत्थान पावणारी
- **(२)तत्पदनिष्ठ**
  - * आत्म-भिन्न
  - * बाह्य
  - * सगुण
    - **()एकदेशीय इव व्यापक समाधी**
      - * नामरूपसहित
      - * अन्वयाने मिळणारी
      - * व्युत्थान रहित
    - **()एकदेशीय** सगुण समाधी

*(प्रियलीलामहोत्सव,यष्टी.३,अ.६,पा.८४)*

**२. तत्पदनिष्ठ समाधि : आत्म-भिन्न**

वरील त्वंपदनिष्ठ म्हणजे आत्म्याशी अभिन्न असलेली समाधी साधल्यानंतर पुनः पुनः वृत्ती स्फुरण पावत असतात. वृत्ती हृदयाच्या बाहेर धावतात. त्यावेळी भक्तांच्या वृत्तींचा विषय मिथ्या जगातील नामरूपे न होता, **प्रेममय आनंदेदंतारूप** (आनंद+इदंता) सगुण साकार भगवद्‌विग्रह होतो. त्यावेळी तत्पदनिष्ठ म्हणजे आत्म-भिन्न असलेली समाधी साधली जाते. यात सगुण भगवंताचा व्यापक साक्षात्कार असतो. सर्व नामरूपे प्रेमस्वरूप सगुणसाकार भगवंताचीच असल्याचे अनुभवाला येते. जेथे जेथे मन जाईल तेथे तेथे भगवंताची सुकुमार पाऊलेच अनुभवली जातात. अत्यंत उत्कट प्रेमामुळे मीपणाच भासत नाही. अहंकाराचा पूर्ण विलय होतो. हेच ''अर्पण-रूप'' प्रेम म्हटले जाते. **''संयोगेपि वियोगोपलालनाचे परमप्रेम''** याच तत्पदनिष्ठेत प्रगट होते. योग व ज्ञानाने व्यतिरेकानुभव आल्यानंतर मग ही तत्पदनिष्ठ बाह्यसमाधी पराभक्तीने साधली जाऊन अन्वय पूर्ण होतो.





या दोन्ही आंतर आणि बाह्य समाधींचे रक्षण 'तत्त्वमसि' या महावाक्याच्या साह्याने करायचे असते.[३७] या तत्पदनिष्ठ समाधीचे भक्तिमय स्वरूप योगशास्त्रात विस्ताराने मांडलेले नाही. याचे कारण असे की परप्रेमाचे गुरुगम्य सिद्धान्त गुरुमुखानेच श्रवण करावयाचे असतात. ही सिद्धान्त-मौक्तिके संतवाङ्‌मयात आणि भागवतादी भक्तिशास्त्रात अनेक ठिकाणी विखुरलेली आढळतात.

ज्ञानोत्तर भक्तीने अनुभूत होणाऱ्या, बाह्य वाटणाऱ्या सगुण श्रीहरीचे ठिकाणी जी समाधी साधली जाते तिलाच तत्पदनिष्ठ आणि आत्मभिन्न अशी नावे देऊन सुस्पष्ट मांडणी महाराजांनी नव्याने केली आहे. अर्थात ही समाधी योगयुक्त पराभक्तीने लवकर साधली जाते.

त्वंपदनिष्ठ समाधीलाच **काष्ठसमाधी** असे गौणतादर्शक नाव संतांनी दिले आहे. ती अन्वयरूपिणी भक्तीच्या म्हणजेच तत्पदनिष्ठ सहज-समाधीच्या मानाने, ही खालची पायरी आहे. परंतु प्रथम ती साधल्याशिवाय पुढची समाधी मिळू शकत नाही. म्हणून तिचे पहिली पायरी म्हणून नितांत अपरिहार्य महत्व आहे.





संत मुक्ताबाई म्हणतात-

**झालासी तटस्थ नव्हे ती समाधी । उपायांची शुद्धी नेणोनिया ॥**
**काष्टाऐसा जड तैसा तूं झालासी । स्वरूप नेणसी श्रमूनिया ॥**

श्रीतुकाराम महाराज म्हणतात- **ताटस्थ्या-कारणे समाधी म्हणती । उघडी फजिती जनामध्ये ॥**

श्रीगुलाबराव महाराज म्हणतात-

**मागा बोलिला समाधी । परी ताटस्थ्य बुद्धी ।**
**सर्व व्यापकत्व सिद्धी । घटो न शके ॥२॥**[३८]
**उठलिया जरी नानारूप वृत्ती । तरी दुःख देती, ऐसे नाही ॥**
**आकाशी पवन, सागरी तरंग । तैशा ब्रह्मरंग वृत्ती साऱ्या ॥**
**तुज वाटे वृत्ती सकळही जाव्या । जडाचिया ठेव्या, कां घेतेस?**
**चेतन ही वस्तू विश्वमय स्फूर्ती । तेचि नानावृत्तिरूप होय ॥**
**ब्रह्मीचे तरंग तैसे जाणा जग । जाणुनिया रंग आत्मरंगी ॥**
**जे जे वृत्ती ते ते माझी न म्हणावी । ब्रह्मरथ करावी स्थिरबुद्धी ॥**[३९]

याप्रमाणे महाराजांनी संतांचा मागोवा घेत घेत सविस्तर विवेचन केले आहे. त्वंपदनिष्ठ निर्गुण व्यतिरेक समाधीला काष्ठसमाधी किंवा तटस्थसमाधी अशी नावे देऊन तिचे सहज समाधीच्या दृष्टीने गौणत्व दर्शविले आहे.
**काष्ठा ऐसा जड होऊन समाधीचे सुख भोगण्यापेक्षा- ''वृत्ती**





**स्फुरण पावली असताना देखील ब्रह्मसुखात उणीव न येणे**'' हीच श्रेष्ठ अवस्था आहे. आणि अनध्यस्थ विवर्त श्रीकृष्णावर प्रेम केल्याने ती सहजसमाधी सहजच सांपडते, असे युक्तिवादपूर्वक विस्ताराने मांडले आहे. ते वाचताना, **''बोले चाले हिंडे । परी त्याची समाधि न खंडे ''**या श्रीधरांच्या उक्तीची आठवण येते. एकूण काय तर,

(१) '**नेति नेति**' या श्रुती त्वंपदनिष्ठ निर्गुण समाधीचे स्वरूप सांगतात

(२) **'सर्वगंधः सर्वरसः सहस्त्रशीर्षः सहस्त्रपादः'** वगैरे श्रुती वृत्तींच्या स्फुरणकाली भासणाऱ्या व्युत्थानामध्ये, सर्व नामरूपात्मक चिद्विलास प्रत्ययाचे म्हणजेच अन्वयरूप भक्तीने प्राप्त होणाऱ्या 'तत्पदनिष्ठ' समाधीचे वर्णन करतात.

अशा रीतीने महाराजांनी समाधीतील अनुभूतींचे सूक्ष्म धागेदोरे अनेकशः उलगडून दाखविले आहेत. त्यातील काही महत्वाचे विशेष आपण थोडक्यात नजरेखालून घातले.

**समाधीने सर्वज्ञता**

समाधी साधली की योगी सर्वज्ञ होतो ''**येन विज्ञातेन सर्व विज्ञातं भवति**'' असे आपण नेहमी ऐकतो. योगशास्त्रात त्याचे उपायही सांगितले आहेत. परंतु ते कसे

काय होते याचे महाराजांनी सरळ सोप्या मराठी भाषेत विवेचन केले असून ते नावीन्यपूर्ण आहे. विभूतिपादात कुठेकुठे संयम केला असता कोणकोणत्या विषयांचे ज्ञाने होते यासंबंधी सविस्तर उपायही सांगितले आहेत. त्या सर्वांचा मथितार्थ महाराजांच्या योगप्रभाव या गद्यग्रंथात आला आहे.

**सवितर्क समाधी** - जेव्हा शब्द, अर्थ व ज्ञान हे तिन्ही समाधिदशेत एकरूपच मनात येतात तेव्हा त्याला सवितर्क समाधी म्हणतात. म्हणजे विष्णूवर चित्त एकाग्र केले तर विष्णू वैकुंठात असला तरी योग्याला त्याचा साक्षात्कार येथेच होईल. या सवितर्क समाधीत जो साक्षात्कार होतो त्याला **'अपर प्रत्यक्ष'** म्हणतात. हे दोन प्रकारचे - १. प्रज्ञाप्रत्यक्ष व २. इंद्रियप्रत्यक्ष.

**१. प्रज्ञा-प्रत्यक्ष**

प्रज्ञाप्रत्यक्ष म्हणजे ज्या ज्ञानात काहीही संशय नाहीत असे ज्ञान. जसे 'मन आहे' हे आपल्याला प्रत्यक्ष अनुभवाने समजते. पण डोळ्याने दिसत नाही. आणि या ज्ञानाचा बाध देखील होत नाही. ज्यात संशय उत्पन्न होण्यास जागाच नसते तेच हे ज्ञान **प्रज्ञाप्रत्यक्ष** किंवा **आत्मप्रत्यक्ष** होय. समाधीत योग्याला **'ऋतंभरा'** नावाची प्रज्ञा उत्पन्न होते व तिच्या योगाने त्याला सर्व विषय प्रत्यक्ष होतात.[४०]





**निर्वितर्क समाधी** - यात शब्दाची आठवण नसते म्हणजे शब्द मनात न येता नुसता अर्थच त्रिपुटिरहित ध्यानात येतो व चित्त केवळ तन्मय होऊन राहते. ही निर्वितर्क समाधी म्हटली जाते. शब्दांचा संकेत सोडून देऊन नुसत्या अर्थाच्या ध्यानाने योग्यांना इतर विषयांचाही साक्षात्कार होतो तीच ही निर्वितर्क- समापत्ती होय. यात वस्तूच्या साक्षात्कारास अनुमानाची व शब्दाची गरज नसते. जिकडे चित्त जाईल तिकडे त्याला ज्ञान होते. शब्द आठवला तरच योग्याला ज्ञान होईल असे मुळीच नसते.

**''हे योग्याला होणारे प्रत्यक्षज्ञानच शास्त्राला आणि अनुमानाला बीज आहे''** (योगप्रभाव पा. ४५६)

ज्ञानेश्वरीत सांगितल्याप्रमाणे ''सकळ शास्त्रांची अनोळखी फिटून जाण्याचे स्थान'' हेच आहे. न्याय, व्याकरण, सांख्य, योग, वेदान्त, आयुर्वेद वगैरे सर्व शास्त्रे व्यवहारात परस्पर भांडत असताना दिसतात पण त्या सर्वांचें जे मूळ आहे ते मात्र एका समाधिस्थितीतच आहे. म्हणून बाहेर जरी परस्परांशी ते विरोध करीत दिसले तरी मूळात मात्र यत्किंचितही विरोध नाही. हेच 'सकळ





शास्त्रांची अनोळखी फिटे' या ओवीने अभिप्रेत आहे.

**अन्तःस्फूर्तीचे ज्ञान**

ज्ञान होण्याचे तीन प्रकार आहेत. (१)नैसर्गिकपणे इंद्रियांनी होणारे ज्ञान, (२) विचार-ज्ञान व (३) अन्तःस्फूर्तीचे ज्ञान.

ज्याच्या योगाने विचारावाचून समाधान होते ते 'अन्तःस्फूर्तीचे ज्ञान' होय. हे ज्ञानच साऱ्या ज्ञानांपेक्षा उच्च आहे. पण हे ज्ञान विचार-ज्ञानाच्या विरोधी नसते. तेही विचारातच येते व दुसऱ्यालाही ते विचारयुक्तच मिळते. समाधीत योग्याला ऋतंभराप्रज्ञा उत्पन्न होऊन ही अन्तःस्फूर्ती प्राप्त होते.

सवितर्क समाधीत देखील कोणत्याही विषयाचे ज्ञान अन्तःस्फूर्तीनेच होत असते.

मोठमोठे शास्त्रज्ञ देखील एकाग्र अवस्थेत जाऊन मोठमोठे शोध लावीत असतात. त्या सर्व नवीन विचारांचे स्फुरण या सवितर्क समाधीतच होते. परंतु ''ते शास्त्रज्ञ अजाणता त्या एकाग्र अवस्थेत पोहोचतात आणि योगीलोक जाणीवपूर्वक प्रयत्न करून ती अवस्था प्राप्त करून घेतात.'' येवढाच या दोहोत फरक आहे.





**निर्वितर्कसमाधी -**

निर्वितर्कसमाधीत शब्दाशिवाय सर्व अर्थांचे ज्ञान होत असते. म्हणून हीच सवितर्कसमाधीपेक्षा श्रेष्ठ आहे. सर्व भारतीय शास्त्रकारांनी आयुर्वेद, न्याय, सांख्य, ज्योतिष, संगीत, गणित वगैरे सर्व प्रकारची लौकिक आणि अलौकिक शास्त्रे, निर्वितर्कसमाधीत ऋतंभरा प्रज्ञेने प्रत्यक्ष यथार्थ ज्ञान करून घेऊन त्यानुसार रचली आहेत म्हणून ती शास्त्रे अगदी मुळाशी जाऊन भिडली आहेत. त्यामुळे

आजही कितीही नवे शोध लागले तरी त्यांचे संदर्भ प्राचीन आर्यशास्त्रात कोठेतरी सांपडतातच !

**भारतीय आणि पाश्चात्य ज्ञानपरंपरा**

या समाधीतून मिळणाऱ्या ज्ञानानुसार ऋषीमुनींनी सूत्ररचना केली आणि नंतर त्यांच्या शिष्यपरंपरेने त्या त्या शास्त्रांचा विस्तार केला. त्यामुळे भारतीय शास्त्रांचा विस्तार अफाट झालेला आहे; परंतु त्यात मूळापेक्षा वेगळे नवीन असे काही सांगितले जाऊ शकत नाही. सूक्ष्म धागेदोरे नव्याने सांगितल्या जातात पण ते मूळाच्या विरोधी नसतात. हा भारतीय शास्त्रांचा विशेष आजही प्रत्ययाला येत आहे.

दर्शनकारांनी समाधीत प्रज्ञा-प्रत्यक्ष केलेल्या विषयांचा साक्षात्कार करून घेऊन त्यानुसार शास्त्रे निर्माण केलीत. ''**कमीत कमी शब्दात असूनही सर्वतोमुख असलेली सूत्र रचना केली**.'' पुढे त्याच सूत्रांवर नंतरच्या विचारवंतानी अभ्यास करून देशकाल परिस्थित्यनुसार उत्पन्न झालेल्या प्रश्नांची सोडवणुक केली. तसा तसा त्या त्या शास्त्रांचा अधिक अधिक विस्तार होत गेला. पण तो सारा विस्तार मूळ सूत्रांतच बीजरूपाने आढळतो.

याउलट पाश्चात्य परंपरेत जुन्या विचारांना त्याज्य ठरवून नंतर मग आपले नवीन विचार शास्त्रज्ञ मांडीत असतात. नवीन शोध जुन्या शोधांना मूठमाती देत असतात. पण आपल्या भारतीय संस्कृतीत असे होत नाही. तर्क आणि प्रयोग हे सर्व मूळसूत्रातील विचारांचाच विस्तार करीत असतात. म्हणूनच भारतीय शास्त्रात अगदी नवीन असे काही दाखविता येत नाही. पण योजना मात्र नवीन असते. याप्रमाणे आपल्या येथे शास्त्रांच्या विस्ताराला अफाट वाव असला तरी मूळ सूत्रे तशीच प्रमाण म्हणून कायम राहतात. आणि पुढेही कायमच राहणार आहेत.





या समाधिस्थितीत प्राप्त झालेल्या ज्ञानाला कोणीही ऋषीमुनी 'मी स्वतः शास्त्र तयार केले' असे म्हणावयास तयार नाहीत. सर्व कर्तृत्व ते ईश्वराकडेच देतात. त्यामुळेच सर्व ज्ञानशाखा ईश्वरप्रणीतच म्हटल्या गेल्या आहेत. त्यांचे त्रिकालाबाधितत्व देखील यामुळेच सिद्ध होते.

**तया सिद्धप्रज्ञेचेनि लाभे । मनचि सारस्वते दुभे ।**
**सकळ शास्त्रे स्वयंभे । निघती मुखे ॥ज्ञाने.४५४-६**

याच तत्त्वानुसारच सर्व शास्त्रांच्या मुळाशी जाऊन ऊहापोह करणाऱ्या महाराजांच्या प्रज्ञाचक्षुत्वाचे प्रत्यन्तर मिळते. महाराजांचे अल्प वय, शैशवापासून अंधत्व, खेड्यातील जन्म, शिक्षणाचा अभाव वगैरे सर्व अडचणी असूनही इतकी अफाट वैचारिक वाङ्मयरचना निर्माण करण्याचे मर्म समाधीतील याच ऋतंभरा प्रज्ञेत साठविले आहे, हेच खरे !

**वेदांचे अपौरुषेयत्व**

वेद हे अपौरुषेय आहेत यासंबंधी सर्व वैदिक आणि आस्तिक दर्शनांनी प्रमाणे व युक्त्या देऊन आपले म्हणणे मांडले आहे. वेद ईश्वरप्रणीत आहेत. नित्य आहेत.





ब्रह्मदेवाच्या मुखातून सृष्टीच्या आरंभी वेद उत्पन्न झाले. '**यस्य निश्वसितं वेदाः**' यासारखी अनेक प्रमाणे देऊन सिद्ध केले आहे. परंतु महाराजांनी जुनी प्रमाणे व युक्ती यांच्या साह्याला अनुभवाची जोड दिली आहे.

योगशास्त्रद्वारा प्रायोगिक पद्धतीने वेदांच्या अपौरुषेयत्वाचा, ईश्वरप्रणीतत्वाचा व नित्यतेचा कसा अनुभव घ्यावा याचे विवेचन करून योगशास्त्राच्या महत्वाच्या अंगावर प्रकाशझोत टाकला आहे.

**वेद आजही ऐकू येतात**

योग्यांना आणि ज्ञानमार्गियांना समाधिस्थितीत अनाहत नाद ऐकू येत असतो. योग्यांनी 'शब्दा' वर 'धारणा-ध्यान-समाधिरूपी संयम'' केला म्हणजे अनाहत नादाचे दशविध प्रकार प्रथम ऐकू येतात, नंतर ॐकार ऐकू येतो. योग्याची केवळ निर्गुण उपासनाच असेल तर त्याला दहाप्रकारचा अनाहत नादच ऐकू येईल.पण जर ईश्वरप्रणिधानपूर्वक संयम करणारा योगी असेल तर मात्र ॐकारानंतर वेदांचे मंत्र ऐकू येतात. हेच 'वेदांचे श्रवण होय. हे मंत्र अनंत आहेत. 'अनन्ता वै वेदाः' त्यापैकी





फारच थोडे ऋषींनी लोककल्याणासाठी प्रकट केले आहेत आणि बाकीचे सर्वसामान्य लोकांकरता अव्यक्तच आहेत.

सृष्टीच्या आरंभी ॐकार उत्पन्न झाला व नंतर ब्रह्मदेवाच्या मुखातून वेद उत्पन्न झाले. जर त्यांचा शब्दाप्रमाणे उत्पन्न होताच लय झाला असता तर पुनः पुनः ऋषींना आणि योग्यांना ते ऐकू आले नसते. परंतु वेद नित्य आहेत म्हणूनच वैदिक ऋषींना, पौराणिक मुनींना, योग्यांना आणि संतसत्पुरुषांना समाधीमध्ये वेद जसेच्या तसे आजतागायत श्रवणीय आहेत. या सर्व विषयाचा उहापोह महाराजांनी **योगप्रभाव** या ग्रंथात सविस्तर रीतीने केला आहे.

''नाद हा कंठातून निघतो म्हणून जीभेच्या मूळाशी धारणा सांगितली आहे. तेथे शब्दावर धारणा केली असता प्रथम अनाहत नाद ऐकू येतो व पुढे ॐकार व नंतर दिव्यशब्द ऐकू येतात. हे दिव्यशब्द सार्थ असतात. हे नुसत्या धारणेचे फल झाले. पण पुढे हीच धारणा ईश्वराच्या प्रणिधानासह केली तर प्रथम ॐकार दिव्य शब्द असल्यामुळे तोच एकू येईल व नंतर श्रुती ऐकू येतील'' (योगप्रभाव पा.२४५-२४६) ऋषींनाही याच रीतीने श्रुती ऐकू आल्या. भागवतात

'**वृत्तिरोधाद्विभाव्यते**' म्हणजे धारणेने प्रणव ऐकू येतो असे म्हटले आहे.[४१]

अशा या ध्यानयोगानेच सर्व धर्मांचे संस्थापक ईश्वराचा साक्षात्कार करून घेऊन त्याची वाणी ऐकतात आणि नंतर लोकांच्या अधिकारानुसार वेगवेगळ्या धर्मांची स्थापना करतात. विवेकानंदही असेच म्हणतात की ''सर्व धर्मांच्या प्रवृत्ती ध्यानयोगापासूनच प्रगट झाल्या आहेत.''[४२]

* याप्रमाणे शब्दावर संयम केला असता योगीभक्तांना अनाहत नाद वेदरूपाने ऐकू येतो. म्हणूनच वेदांना '**श्रुती**' (म्हणजे ऐकण्याजोग्या- ऐकलेल्या) असे सार्थ नाव दिलेले आहे.

* त्या श्रुती दिव्यदृष्टीने पाहिल्याही जातात म्हणून वेदांना पहाणाऱ्या ऋषींना '**द्रष्टे**' असे पारिभाषिक नाव आहे.

* कोणीही केव्हाही योगाभ्यास करून वेदमंत्र ऐकू शकतात व पाहू शकतात म्हणून वेदमंत्र '**नित्य**' आहेत.

* हे मंत्र कोण्याही ऋषीने किंवा जीवपुरुषाने रचलेले नाहीत म्हणूनच ते '**अपौरुषेय**' आहेत आणि '**अनाहत**' म्हणजे कोणीही न वाजविलेले-आपोआप उत्पन्न होणारे आहेत.





अशा या सनातन वैदिक सिद्धान्ताचा योगमार्गद्वारा कसा अनुभव घ्याचा याचे सविस्तर विवेचन आणि मार्गदर्शन महाराजांनी योगप्रभावात केले आहे. तसेच संप्रदायसुरतरूत ८ व्या अध्यायातील ओवीबंधात[४३] सूत्रबद्ध मांडणी केली आहे.

१) योग्याच्या हृदयातील परमेश्वर हृदयाकाशात अनाहत नादातून श्रुती व्यक्त करतो. तेव्हा प्रथम ओंकार व नंतर चारही वेद ऐकूं येतात.

२) किंवा कुंडलिनी जागृत झाल्यानंतर स्वाधिष्ठान नामक चक्रावर योगी आरूढ झाला असता ब्रह्मदेव आपल्या चार मुखांनी चार वेद सांगत आहे, असा साक्षात्कार होतो.

३) किंवा कुंभक साधून ब्रह्मदेवाचे ध्यान हृदयात केले असता तेथेही अनाहतवाद व त्यातून सार्थ शब्दोत्पत्ती म्हणजेच वेद ऐकू येतात.

**वेदांचा तो अर्थ आम्हासचि ठावा । इतरांनी वाहावा भार माथा ॥** या तुकाराम महाराजांच्या उक्तीचा अर्थ आणि त्यातून सूचित होणारा सिद्धान्त वरील प्रमाणेच आहे.

स्वतः महाराज देखील संस्कारलोप झाल्यामुळे





स्वतःला शूद्र म्हणवीत असत. त्यांना वेदाधिकार नव्हता. त्यांनी कोणाजवळ वेदपठण केले नाही किंवा वेद वाचूनही पाठ केले नाहीत. ते जन्मांध होते. त्यांच्यावर शिक्षणाचा संस्कार झाला नाही. इतके असूनही त्यांनी त्यांच्या वाङ्मयात जागोजाग वैदिक श्रुतींची प्रमाणे दिली आहेत. याचा अर्थ महाराजांनी वर मांडलेला स्वानुभूतीचा सिद्धान्तच बरोबर आहे असे निश्चित ठरते.

योगाच्या धारणेने वेद प्रत्यक्ष होतात. श्रुतिरूपाने ऐकू येतात. म्हणूनच ते अपौरुषेय व नित्य आहेत. आजही कोणाची इच्छा असेल तर त्याने शास्त्रानुसार योगाचा प्रयत्न करावा व या सिद्धान्ताचा प्रयोगिक पडताळा घ्यावा. याप्रमाणे अनुभवप्रचुर युक्तिवादाने जुनाच सिद्धान्त जणुंकाय स्वतःचा दृष्टान्त देऊन नवीन रीतीने महाराजांनी मांडला आहे. यातच त्यांचे वैशिष्ट्य आहे.

**योग आणि भक्ती**

(ईश्वरप्रणिधान)

**'ईश्वरप्रणिधानाद् वा ॥२३॥**
**तज्जपस्तदर्थभावनम् ॥२८॥ समाधिपाद**
**समाधिसिद्धिरीश्वरप्रणिधानात्' ॥४५॥ साधनपाद**





अशी भक्तीला मानाचे स्थान देणारी सूत्रे योगशास्त्रात आहेत. आता हे स्थान कोणते आहे याचा विचार महाराजांनी सांगोपांग रीतीने मांडला आहे.

'**ईश्वरप्रणिधानाद्वा**' या समाधिपादातील सूत्रातील 'वा' या अव्ययाचा अर्थ काहींनी '**विकल्प**' असा केला आहे आणि ईश्वरप्रणिधानाला गौणत्व दिले आहे. परंतु महाराजांनी 'वा' चा अर्थ विकल्पार्थी स्वीकारला असला तरी त्यात योगाची आणि भक्तीची समानता दाखवून दिली आहे. आणि याहीपेक्षा '**निश्चय**' असा नवीन अर्थ सुचवून योगसाधनेबरोबर समुचित ईश्वरप्रणिधान असलेच पाहिजे, किंवा केवळ ईश्वरप्रणिधानाने ''असंप्रज्ञातसमाधी'' प्राप्त होऊ शकते, असा घेरंडाचार्यांचा दाखला देऊन ईश्वरप्रणिधानाचे महत्त्व विशद केले आहे.

समाधिपादात मनाच्या तीव्र संवेगाने योग साधतो असे सांगितले आहे आणि या सूत्रात ईश्वरप्रणिधानानेही तेच कार्य होते असे सांगतात 'वा' हे व्याकरणात विकल्पार्थी आहे म्हणून तीव्र संवेग नसला तरी समाधी ईश्वरप्रणिधानाने साधता येते असा त्याचा अर्थ आहे.

हे सूत्र योगशास्त्रात महत्वाचे आहे. कारण यात भक्तीचा स्वीकार केला आहे. भाष्यकार **'प्रणिधानात्'** याचा अर्थ **'भक्तिविशेषात्'** असा करतात. व वार्तिककार **''भक्तिविशेष''** म्हणजे **''प्रेमलक्षणा भक्ती''** असा करतात.

साधनपादातील ईश्वारप्रणिधानाचा अर्थ - ईश्वराची पूजाअर्चा, नियम वगैरे गौणीभक्ती असा आहे. हिने संप्रज्ञात समाधी सिद्ध होते ''**गौण्या तु समाधिसिद्धिः**'' हे शांडिल्यांचे भक्तिसूत्र याच अर्थाचे द्योतक आहे. आणि त्यानंतर उपास्याचे परमप्रेम उत्पन्न होऊन असंप्रज्ञात समाधी साधण्यासाठी प्रेमलक्षणा पराभक्ती प्राप्त होते. आपल्यावर आपण जशी प्रीती करतो तशीच ती ईश्वरावर करणे हिलाच प्रेमलक्षणा भक्ती म्हणतात. शांडिल्य हिलाच पराभक्ती म्हणतात. समाधिपादील हेच ईश्वराचे प्रणिधान होय. हिच्याच योगाने असंप्रज्ञात समाधी मनाचा तीव्र संवेग नसला तरी लवकर सिद्ध होते.

नुसत्या निर्गुणध्यानापेक्षा सगुणध्यानाने विषयाकडील चित्त लवकर निवृत्त होते. विषय आपोआप सुटतात. वैराग्य लवकर येते. म्हणूनच 'वा' या अव्ययाचा





अर्थ निश्चयार्थी आहे. म्हणून आपल्याला जो अवतारविग्रह आवडेल त्याचेच ध्यान व उपासना करावी.

**भक्ती नसतां योगादिकीं । चित्तवृत्ती न शमे निकी ।**
**आणि मुकुंदसेवा घडता निकी । मनोवृत्ती सहज शमे ।।५९।।**
**अजपा जपणे उलट प्राणाचा । येथेहि नामाचाचा निर्धार असे ।**
**ऐसे तातवाणी हरिपाठ ग्रंथी । योगासी निश्चिती नामापेक्षा ।।**
**आणि माझा ऐसा अनुभव आहे । भक्तिविण नोहे शांती चित्ता ।।**[४५]

भक्ती नसेल तर निव्वळ योगाने चित्तवृत्ती निरोध पावतील पण नष्ट होणार नाहीत. म्हणूनच समाधीतून व्युत्थान झाले की पुनः वासना उत्पन्न होऊन सुखदुःखांचे भोग घडतात. यासाठी वृत्तींच्या व्युत्थानात सर्व वृत्ती सगुणविग्रहावर अर्पण केल्या की आत समाधी व बाहेर भक्ती, म्हणजे आत निर्गुणानंद व बाहेर सगुणानंद, असा एकरस ब्रह्मानुभवच अखंड होऊन राहतो. अशा पूर्णब्रह्मरूप चिद्विलासाच्या प्रत्ययासाठी ईश्वरप्रणिधान आवश्यक आहे. या सर्व विवेचनाचा सारांश असा की,

१) साधन दशेतील ईश्वर प्रणिधानाने संप्रज्ञात समाधी.

२) समाधिपादातील ईश्वरप्रणिधानाने असंप्रज्ञात समाधी.





३) नंतरच्या ईश्वरप्रणिधानाने व्युत्थानातही ब्रह्मरूपता प्राप्त होऊन योगी पूर्ण होतो.

**<u>प्रणिधानभिन्न उपायांचे प्रयोजन</u>**

जर समाधीसाठी ईश्वरप्रणिधान आवश्यक आहे आणि योगाशिवाय ईश्वर प्रणिधानाने समाधी मिळते व योगापेक्षा ते सोपेही आहे, तर योगशास्त्र कशाला सांगितले? या प्रश्नाचे उत्तर महाराजांनी दोन सुंदर दृष्टांन्तांनी समजावून दिले आहे.[४६]

१) जर आपल्याला जेवणाची तृप्ती पाहिजे असेल तर स्वयंपाकाची सर्व सामग्री जुळवून स्वहस्ताने स्वयंपाक करून जेवण करावे म्हणजे तृप्ती होते किंवा आईकडे प्रेमाने हट्ट करावा म्हणजे ती जेवू घालते. - त्याचप्रमाणे योगशास्त्रानुसार कष्ट करून स्वतःच्या प्रयत्नाने समाधिसिद्धि करून घ्यावी. हे योगाचे प्रयत्न कसे करावे, त्यासंधी सविस्तर ऊहापोह करून योगशास्त्राची मांडणी शास्त्रकारांनी केली आहे आणि पुढे तेच शास्त्रकार सांगतात की योगाचा अभ्यास करताना ईश्वर-प्रणिधान असले तर लवकर योगसिद्धी होते. किंवा केवळ ईश्वरप्रणिधानच जरी असले तरी योगाशिवाय देखील फलसिद्धी होते.





२) दुसरा दृष्टांत रोग्याचा आहे. रोग्याला तहान लागली तर त्याने उठून पाणी प्यावे म्हणजे त्याची तहान शांत होईल. पण जर तो उठून बसू शकत नसेल तर दुसऱ्याने त्याला पाणी पाजावे. या दोन्ही पाणी पिण्याच्या साधनात फरक असला तरी तृषा-हरणामध्ये काहीच फरक नाही.

त्याचप्रमाणे जो स्वतःहून प्रयत्न करण्यास असमर्थ आहे, ज्याचे चित्त निर्गुणात प्रवेश करू शकत नाही, त्याने केवळ ईश्वराधान करावे, असे विकल्पाने सूत्रकारांनी सांगितले आहे. उपायासाठी विकल्प सांगितले असून फळ मात्र एकच आहे म्हणून ईश्वराराधन गौण आहे असे कल्पिताच येत नाही. म्हणून जो योगाचे कष्ट करण्यास असमर्थ आहे त्याने कृपाकुशल भगवंतमातेची स्तन्यपानार्थ आळ घ्यावी. त्यामुळे शारीरिक कष्ट न होता केवळ प्रेमानेच असंप्रज्ञात समाधीपर्यंत भगवती गुरुमातेच्या कडेवर बसून पोहोचता येते.[४७]

योगाभ्यासाचा प्रयत्न न सांगता पहिलेच जर ईश्वरप्रणिधान मुख्य म्हणून सांगितले असते तर 'प्रयत्न न करता परमेश्वराने आपणहून आम्हाला उद्धरून न्यावे'

असा जीवांचा समज झाला असता. एवढ्याकरता - ''**जीव प्रयत्नात आरंभ होऊन ईश्वरप्राप्तीत समाप्ती व्हावी**'' म्हणून ईश्वरप्रणिधान नंतर सांगितले आहे.[४८]

खरे मुमुक्षुत्व नसूनही केवळ सिद्धींच्या आशेने सकाम लोकांची योगाकडे प्रवृत्ती होते. आणि कामनेचा नियम तर असा आहे की तिला जितके जितके विषय द्यावे तितकी तितकी तूप घातलेल्या अग्नीप्रमाणे ती वाढतच जाते. या सकामांना जर ईश्वरप्रणिधान सांगितले तर 'ईश्वराचे ऐश्वर्य आपल्याला असावे'. अशी ते अपेक्षा करतील व एकदा ईश्वराच्या नित्य ऐश्वर्याची वासना झाली म्हणजे कधीही वैराग्य होणार नाही. वैराग्य न झाल्यामुळे, ईश्वर जसा ऐश्वर्याचा साक्षी असतो, तसे साक्षी न होता, हे सकाम उपासक उलट भोक्ते होतील.[४९] म्हणून योगशास्त्रात वैराग्य आणि स्वप्रयत्नावर जोर दिला आहे.

सकाम लोकांची वासना सिद्धिपर्यवसायी असल्याने भिन्न भिन्न सिद्धीसाठी भिन्न भिन्न उपाय सांगितले आहेत. त्यासाठी अत्यंत श्रमही लागतात. आणि शेवटी या उपायसाध्य सिद्धी फलरूप म्हणून अनित्यच आहेत, म्हणून त्यांचा उपयोग नाही.





अतएव ''जसे विषयात दुःख आहे तसेच या सिद्धी मिळवून घेण्यासाठी दुःखच आहे. एवढ्यासाठीच इहलोकाच्या भोगाप्रमाणे पारलौकिक व सिद्धिजन्य भोगही श्वानविष्ठेप्रमाणे त्याज्यच आहेत,'' असा सकाम धर्मनिष्ठांच्या चित्तात विचार येऊन त्यांना वैराग्य व्हावे, हाच ईश्वरप्रणिधानभिन्न अनेक उपाय सांगण्याचा उद्देश आहे[५०] असे महाराज म्हणतात.

**ईश्वरप्रणिधान**

**१. आत्म-अभिन्न / २. आत्म-भिन्न**

महाराजांनी ईश्वरप्रणिधानाचे हे दोन प्रकार मागीलप्रमाणेच अगदी नवीन सांगितले आहेत. आत्म्याहून अभिन्न आणि आत्म्याहून भिन्न असे दोन प्रकार केल्यामुळे **'नेति-नेति'** आणि **'सर्व गन्धः सर्व रसः'** या दोन श्रुतीतील विरोध नाहीसा होऊन त्यांची उत्तम संगती लावली आहे.[५१]

द्विविध ईश्वरप्रणिधान । आत्माभिन्न आणि आत्मभिन्न ।
आत्माभिन्न निर्गुण-प्रणिधान ।आणि आत्मभिन्न सगुणपूजा ॥८२॥
परेश्वराते वर्णिता । द्विविध उल्हसिली श्रुतिमाता ।
निषेध आणि विहिता । वाक्या घेऊनी ॥८६॥





तेथ 'नेति नेति' इत्यादि वचने ।
प्रवर्तू न शकती आत्मभिन्ने । 'सर्वगन्धः सर्वरसः'
इत्यादि वचने । आत्मभिन्न प्रवर्तोत ॥८७॥
... म्हणोनी निजप्रयत्ने करून । आत्म अभिन्न परेशप्रणिधान ।
प्रथम मुख्ययोग सांगून । स्वभिन्नेशप्रणिधान । विकल्पे वदले ॥९३॥

***(तक्ता-३)***

**१. आत्म-अभिन्न प्राणिधान**

आत्म्याहून अभिन्न असा जो ईश्वर आहे त्याचे प्रणिधान म्हणजे निर्गुणाचे ध्यान, ओंकाराचा जप आणि देहादि सर्व बाह्य पदार्थाचा 'नेति नेति' या श्रुतिवाक्याने निषेध करून, हृदयस्थ आत्म्याच्या ठिकाणी सर्ववृत्तींचा लय करणे होय. यासाठी योगाचे कष्टदायक प्रयत्न करावे लागतात. याने परब्रह्माचा व्यतिरेकानुभव प्राप्त होतो. ही निर्गुण समाधिस्थिती योगी, ज्ञानी किंवा भक्ताला प्राप्त करून घ्यावीच लागते. त्यानंतरच अन्वयानुभव घ्यावयाचा असतो.





**(तक्ता -३) ईश्वरप्रणिधान**

| | |
|---|---|
| ***आत्म-अभिन्न** | ***आत्म-भिन्न** |
| *निर्गुण | *सगुण |
| *ज्ञानपूर्व-निर्गुण-उपासना | *ज्ञानपूर्व-सगुण-उपासना |
| ००० | *ज्ञानोत्तर-पराभक्ती |
| *व्यतिरेक-**'नेतिनेति'** | *अन्वय-**सर्वगन्धःसर्वरसः** |

*(योगप्रभाव-यष्टी.१५.ओ.८२-१८८)*

**२. आत्म-भिन्न प्राणिधान**

पण ज्याचे चित्त निर्गुणात प्रवेश करीत नाही, तो प्रथम आपल्याहून ईश्वर भिन्न आहे अशा भावनेने प्रतिमादिकांच्या ठिकाणी ईश्वरप्रणिधान करतो ती उपासना होय. ही उपासना पूर्ण झाली की समाधी प्राप्त होते.

'**गौण्या तु समाधिसिद्धिः**' शांडिल्य-भक्तिसूत्र.

'**ददामि बुद्धियोगम्**' माझ्या उपासकांना मी बुद्धियोग देतो, असे गीतेत श्रीकृष्णानी आश्वासन दिले आहे. साधनपादातील ईश्वरप्रणिधान ते हेच होय.

अशा समाधीनंतर म्हणजे अद्वैतज्ञान प्राप्तीनंतर भक्ताच्या वृत्ती व्युत्थानात स्फुरण पावल्या म्हणजे त्या सर्व सगुण भगवंतावर अर्पण होतात आणि आतील निर्गुण ब्रह्मानंदाप्रमाणे बाहेरही सगुण ब्रह्मानंद त्याला मिळून **अन्वयरूपा पराभक्ती** त्याला प्राप्त होते. हिलाच **निर्वृत्तिक ब्रह्मप्राप्ती** म्हणजेच सहजावस्था म्हणतात.

असे हे प्रणिधान ज्याचे करावयाचे तो ईश्वर पंचक्लेशरहित कसा आहे ते महाराजांनी भगवान् श्रीकृष्णाचे स्वरूप सांगून सविस्तर विवेचन केले आहे.

**ईश्वराचे पंचक्लेशरहित स्वरूप**

**१. अविद्या** - भगवान श्रीकृष्णपरमात्म्याला अविद्याक्लेश कधीच नव्हता, कारण 'देह हाच आत्मा' असे त्याला कधीच वाटले नाही.

**२. अस्मिता** - कृष्णदेहापुरतेच जर त्याचे अनुसंधान असते तर आपल्या मुखात अनंत ब्रह्मांडे त्याला आईला दाखविता आली नसती. म्हणून अस्मिताक्लेश त्याचे ठिकाणी नव्हता.

**३. राग** - रागक्लेश नव्हता कारण यादवकुळाचा त्याने स्वतःच नाश केला.





**४. द्वेष** - शिशुपालादिकांचा वध केला तेव्हा त्यांची ज्योती त्याने आपल्या शरीरात मिळवून घेतली, यावरून द्वेषही नव्हता.

**५. अभिनिवेश** - श्रीकृष्णाला अभिनिवेशही नव्हता. गांधारीने जेव्हा शाप दिला तेव्हा - ''माते, या शापाचीच मी वाट पाहत होतो'' असे शब्द त्यांचे तोंडून निघाले. यावरून त्याला मरणाची भीतीही नव्हती. दुसरे, प्रयाणकाली उद्धवाला ज्ञानाचा उपदेश करून तो आनंदाने निजधामाला गेला.

**६. पुण्य** - पुण्यकर्माचीही त्याला बाधा झाली नाही. कारण ते त्याला स्वर्ग देऊ शकले नाही.

**७. पाप** - गोपिकांशी व्यभिचार वगैरे पापकर्मांचीही फळे त्याला मिळाली नाहीत किंवा त्या कर्मात त्याची वासनाही राहिली नाही. हे सर्व क्लेश भगवान् कृष्णाला कोणत्याच काळी झाले नाहीत, म्हणून तो जीवाला परम भजनीय आहे.[५२]

सगुण निर्गुण दोन्ही ज्याची अंगे ।
तोचि आम्हा संगे क्रीडा करी ।।तुका.।।

याप्रमाणे ईश्वरस्वरूप आणि ईश्वरप्रणिधान यासंबंधी





महाराजांचे वेगळे विचार आहेत. या सर्वांचा निष्कर्ष असा निघतो की -

**१-** 'ईश्वरप्रणिधानाद्वा' या सूत्रातील 'वा' अव्यय विकल्पार्थी मानले तर ईश्वरप्रणिधान 'सम' फल देणारे असल्यामुळे योगापेक्षा गौण नसून बरोबरीचे आहे.

**२-** 'वा' हे अव्यय निश्चयार्थी मानले तर योग करीत असता ईश्वरप्रणिधान सतत असलेच पाहिजे. वासनाक्षय, व मनोनाश यांची प्राप्ती ईश्वरप्रणिधानानेच होते म्हणून ते मुख्य आहे.

**३-** योग आचरून असंप्रज्ञात समाधी साधल्यानंतर चित्त पुनः व्युत्थान पावतेच. त्यावेळी मनोनाश व वासनाक्षयासाठी म्हणजेच प्रारब्धाभिभव होण्यासाठी सगुणभक्तीची आवश्यकता आहे म्हणून ते ईश्वरप्रणिधान योगापेक्षा श्रेष्ठ आहे.

**४-** निव्वळ भक्ती असेल तर योगाचा प्रयत्न न करताही योग साधला जातो. पण भक्ती ही योगात अनिवार्य आहे म्हणून ईश्वरप्रणिधानरूपी **''भक्ती ही 'अंगी' असून योग 'अंगरूप' आहे.''** याप्रमाणे महाराजांनी ईश्वरप्रणिधानाचे यथार्थ स्वरूप दाखवून योगातील सूक्ष्म तत्त्वांचा उलगडा करून दिलेला आहे.





**योगातील त्याज्य अंश**

१)पुरुषबहुता, २)ईश्वरभिन्नता व ३)प्रकृतिसत्यता यांचा परित्याग केला की योग हा वेदान्तदर्शनाला पूरक ठरतो. वेदान्तातही परमार्थप्रयत्न करण्यासाठी सुरुवातीला पुरुषबहुता मानूनच स्वतः एकट्यानेच अभ्यास करायचा असतो. त्यावेळी ईश्वर कर्मफलदाता आहे आणि स्वतःहून भिन्न आहे असे समजून नंतर त्याची उपासना केली जाते. पण जसजसा साधक परमार्थाची वाटचाल करू लागतो तसतसे त्याला 'एकजीव वाद' आणि त्यानंतर 'ईश्वर व मी अभिन्न आहे' असे वरच्या वरच्या भूमिकेवरील ज्ञान सांगितले जाते. आणि ज्ञानसंपन्न झाल्यानंतर त्याला प्रकृतीच खोटी आहे, असा यथार्थ उपदेश केला जातो. शेवटी परमार्थ मार्गाच्या सुरवातीला गृहीत धरलेले पुरुषबहुता, ईश्वरभिन्नता व प्रकृतिसत्यता हे अज्ञान-दशेतील सिद्धान्त सोडून द्यावे लागतात. म्हणून यांचा परित्याग केला की आपोआप वेदान्ताशी योगाचा समन्वय होतो. म्हणजे जीव अज्ञानी असेपर्यंत हे तिन्ही सिद्धान्त खरे वाटतात आणि वेदान्ताने ज्ञान झाले की हे आपोआप सुटून जातात.[५३]

# योग आणि भक्ती : तुलना

महाराजांनी योगाची भक्तीशी मार्मिक तुलना केली आहे. त्यांनी योगसाधनेच्या निरनिराळ्या प्रक्रिया सांगितल्या. योगाची आवश्यकता प्रतिपादन केली. पण शेवटी योग पूर्ण झाल्यावर भक्ती करावीच लागते, या गीतोक्त[५४] सिद्धान्ताप्रमाणे आणि त्यांचा स्वानुभव असल्यामुळे, दोहोतील फरक दाखवितांना भक्तीचे श्रेष्ठत्व त्यांनी प्रतिपादन केले असले तरी योगाबद्दल अनादर बुद्धी मुळीच प्रत्ययाला येत नाही; हे वैशिष्ट्य आहे. या दोहींची तुलना करताना त्यांनी अनेक समर्पक दृष्टांत दिले आहेत.

**पतिव्रता व योगी : तुलना**

**१-** पतिव्रता व योगी यांच्या मनोभावांचा विचार केला असता असे दिसून येते की, पतिव्रतांना मृत्यूचे भय वाटत नाही. त्या पतीवर प्रेम ठेऊन खुशाल सती जातात.

पण योग्यांना मृत्यूचे भय वाटते. प्राणायाम करतांना प्राण घाबरेल व क्वचित शरीरही पडेल या भीतीमुळे योगी





प्राणायाम 'नियमित-नियमानुसार' करतात. त्यांना हे कळत नाही की भगवंताचे ध्यान हृदयात लागले की ज्या क्षणी मरण येईल त्या क्षणी मुक्ती मिळेल, भगवद्रूपता प्राप्त होईल! म्हणून योग्यांपेक्षा पतिव्रता या बाबतीत वरचढच ठरतात.[भक्तिसौरभ]

**२-** भागवतातील यज्ञपत्नींच्या आख्यानात कशी कथा आहे की एका ब्राह्मणाने आपल्या पत्नीला श्रीकृष्णाकडे जाऊ दिले नाही. परंतु तिला तो अडथळा सहन झाला नाही. तिने त्याच क्षणी देहत्याग केला आणि ती दिव्य रूपाने श्रीकृष्णस्वरूपात जाऊन मिळाली. पतिव्रता आणि गोपींच्या उदाहरणावरून देखील भगवद्ध्यान असले तर मृत्यूनंतर भगवत्प्राप्ती निश्चित होते असे दिसते. पण योग्यांना मात्र मृत्यूचे भय वाटते हे आश्चर्यच होय, असे महाराज म्हणतात.[५५]

**योग आणि भक्ती**

यानंतर योग आणि भक्तीतील महाराजांनी दाखवून दिलेले सूक्ष्म फरक क्रमशः पाहू. स्त्रीगीतात त्यांनी जी तुलना केली आहे ती लक्षणीय आहे. -

१) साधोनी प्राणायाम । घाबरा होय जीव ।





गोविंद नाम घेता ग बाई । एक होताती जीव शिव ।।[५६]

प्राणायामाने जीव घाबरा होतो तर

- भक्तीने जीव शिवाशी ऐक्य पावतो.

२) विषय आवरून योग करताना अति कष्ट पडतात

- हरिनाम घेतले की अवघे जगच ब्रह्म होऊन जाते. ५९०

३) योग्यांच्या मनात विषयांचा धाक असतो तर

- भक्तांना विषयच भासत नाहीत. ''विषयोचि ज्यांचा झाला नारायण'' ओवी-५९१

४) निर्गुणाचे ध्यान करताना विषय आड येतात तर

- सगुण भक्तीत विषयच भगवद्रूप होतात.-६४२

५) अजपाजप करताना एकटा प्राणच त्यात गुंतून असतो तर

– प्रेमपूर्वक नामस्मरणात प्राण आणि वाचा दोन्ही मग्न होतात.

६) योगियांची समाधी व्युत्थानात भंग पावते, तर

- भक्तीने सगुण भगवद्रूप अन्तर्बाह्य दिसू लागते व समाधीत खंडच पडत नाही. ओवी-६४८





७) योगाने **निर्गुण** तर भक्तीने **सगुण** प्राप्त होते.[५७]

८) ज्ञानाने **प्रत्यय** येतो तर

- भक्तीने **प्रत्यभिज्ञा** म्हणजेच आनंदाचा अनुभव येतो व आनंदाचे पुनः पुनः स्फुरण होते.

९) योगाने **स्तब्धता** तर – भक्तीने **सगद्‌गदता** प्राप्त होते. अशारीतीने भक्तीने ज्ञान व प्रेम दोन्ही कृष्णरूपी अर्पण होतात.

१०) बलेकरून मन ध्यानात लावले असता योगात दारुण कष्ट होतात तर

- प्रेम उत्पन्न झाले की मन आपण होऊनच तेथे धावते. म्हणून श्रीहरीच्या चरणावाचून योगात समाधान मिळत नाही.[५८]

११) योगी इंद्रियांना कोंडतात व कष्टी होतात. तर भक्त भगवंतावर इंद्रिये अर्पण करून नित्यमुक्त होतात.

१२) अवघ्या जगाचा द्वेष करून एकटेपण (कैवल्य) साधावे तेव्हा कुठे योगध्यान करण्यास अधिकार येतो.

- तसे भक्तीत नाही. सर्व भूतमात्रात श्रीकृष्णरूप पहावे आणि लोकांतात, एकान्तात आणि हृदयात देखील

शांतिस्वरूप होऊन राहावे.[५९]

१३)  मरणसमयी योगी आसन लावतात, प्राणायाम करतात व आपले प्राण ब्रह्मरंध्रात नेतात. हे अतिशय कांटेकोरपणे करावे लागते म्हणजे मोक्ष मिळतो.

- पण भक्ताला असे काहीच करावे लागत नाही. त्यांनी भगवंताला प्रेमाने आठविले की ते तत्क्षणी शरीरातीत होतात. मग कुठला जन्म व कुठले मरण! हे सर्व भाव मिथ्या आहेत अशी त्यांना प्रतीती येते.[६०]

१४)  निर्गुण ध्यान केले असता फक्त चैतन्य कळते.

- तर सगुण ध्यान केले असता चैतन्य आणि आनंद दोन्ही मिळतात.

१५)  भक्तीत मी-पणा क्षीण होतो, अहंकार लीन होतो. व सुषुप्तीसारखे अज्ञान तेही नाश पावते.[६१]

१३)  योगी मनाला जिंकण्यासाठी मृदुसंवेगापासून आरंभ करतात. त्यात कर्तृतंत्र ध्यानासाठी प्रयत्न करावा लागतो.

- भक्तीत मात्र भगवंताकडे चित्त ओढले जाते. त्यात एकदम मध्यसंवेग होतो, म्हणून **योगाचा आरंभ मृदुसंवेगापासून तर भक्तीचा आरंभ मध्यसंवेगापासून असतो.**[६२]





१४)  योगाचा संवेग तीव्र झाला की योगाची समाप्ती होते. म्हणजे योग आचरण्याची आवश्यकताच राहत नाही.

- भक्ती मात्र तीव्र संवेग झाल्यानंतरही कायम राहते **स्वभावो भजनं हरेः**।[६३]

१५)  योगाला ईश्वरप्रणिधानरूप भक्तीची अपेक्षा आहे तर

- भक्तीला योगाची अपेक्षा नाही.[६४]

१६)  केवळ योगाने चित्तवृत्ती निःशेष शमत नाहीत. व्युत्थानात पुनः उठतात.

- भक्तीत चित्तवृत्ती सहज शमतात आणि व्युत्थानातही भगवत्प्रेमाला घेऊनच उठतात.[६५]

१७)  योगात वैराग्यासाठी सतत विषयदोषदर्शन करावेच लागते. त्यामुळे विषयांचा द्वेष दृढमूल होतो. हे क्लेश-दुःखच आहे.

- भक्तीत द्वेष न करता प्रेमाने विषयच भगवदर्पण करायचे असतात. तसे केल्याने आपोआप वैराग्य होते. आणि भगवंताला भोग अर्पण केल्याने आपलाच आनंद द्विगुणित होतो.





'**तत्सुखसुखित्वम्**' प्राप्त होते.

१८)  योगाने ''**काष्ठ समाधी**'' मिळते तर -

भक्तीने ''**चैतन्यानंद समाधी**'' मिळते.

याप्रमाणे योग आणि भक्ती यातील भेद आपण पाहिला. महाराजांनी असे सूक्ष्म भेद अनेक दाखवून दिले असले तरी त्यासोबतच त्यांनी योगशास्त्राचा वेदान्ताशी केलेला समन्वयही समजून घेण्याजोगा आहे. तोही पाहू-

# समन्वय

**सांख्य - योग - ज्ञान - भक्ती**

१- परमेश्वर प्राप्तीची तीन साधने आहेत. उपरती, बोध आणि विराग.

* योगाने इंद्रिये **उपरम** पावतात.
* सांख्योक्त विवेकाने जड अशा भोगांविषयी **विराग** उत्पन्न होतो.
* वेदान्तातील महावाक्याने **ब्रह्मबोध** होतो.
* शेवटी गुरुभक्ती, शिवभक्ती व कृष्णभक्तीमुळे सर्व विघ्ने दूर होऊन **भगवत्प्राप्ती** होते.[६६]





२- सांख्य, योग व वेदान्त यांचे विचारपद्धतिदृष्ट्या सारप्राधान्य काढले तर -

* **सांख्याने** 'त्वं' पदार्थ शोधन,
* **योगाने** तत्पदार्थ शोधन व
* **वेदान्ताने** दोहींचे ऐक्य.

असे निघू शकते. तथापि अनुषंगिकरीत्या प्रत्येक शास्त्रात या तिन्ही पदांचा विचार आलेलाच आहे.[६७]

३- योगाने स्थिरबुद्धी- चित्ताचे ऐकाग्र्य, ज्ञानाने साक्षीपण आणि भगवंताच्या सगुण ध्यानाने अन्वयभक्ती होऊन सर्वत्र चिद्विलासाच्या आनंदाचा प्रत्यय येतो.[६८]

४- **योगेन वासनारोधो, व्युत्थाने विश्वसत्यता ।**
**निरासाय महच्छस्त्रं वेदान्तं श्रुतिशासनम् ।।४४।।** (य.७ पा.२१)

योगाने वृत्तीचा निरोध होऊन समाधी प्राप्त झाली म्हणजे दुःख शांत होते व पुनः समाधीतून वृत्ती उठली म्हणजे जग खरे वाटते. जग खरे वाटत असताना कितीही दिवस समाधी लावून बसले तरी पुनः समाधीतून वृत्ती उठली की जग पुनः खरेच वाटते. म्हणून जग मिथ्या आहे असे पटवून देण्याचे काम सांख्य व योग यांचेकडून होत



***आत्म**
*निर्गु
*ज्ञान
०००
*व्यति

(७७)

नाही. या जगताच्या खरेपणाचा नाश करण्याकरता श्रुतिमातेने शिकविलेले वेदान्तशास्त्रच मोठे भयंकर शस्त्र आहे. म्हणूनच ब्रह्माकारचित्त हे ध्यानाने न होता प्रेमाने झाले पाहिजे.

* ध्यानाने ब्रह्माकार चित्त करणे हा **योग** !
* ज्ञानाने ब्रह्माकार चित्त करणे हा **वेदान्त** !
* परमप्रेमाने अखंड ब्रह्माकार होणे ही **भक्ती** ! [६९]

**समारोप :-**

याप्रमाणे सांख्य, योग, वेदान्त आणि भक्ती ही सर्व एकमेकांना पूरक आहेत. त्यांचा जो विरोध वाटतो तो ' पातळीचा विरोध आहे, अन्तर्गत विरोध नाही'. हा महत्वाचा मुद्दा महाराजांच्या वाङ्मयातून मांडला गेला आहे. साधक असताना वैराग्यपूर्वक योग आचरण करून परमप्राप्ती करून घ्यावी. आणि आधीच जर ज्ञान प्राप्त झाले झाले तर प्रारब्धाचा अभिभव करण्यासाठी किंवा पुष्कळ जन्मांचे प्रारब्ध एकदम भोगून टाकण्यासाठी योगाचा आश्रय करावा. अशी मार्गदर्शनपर तत्त्वे महाराजांच्या वाङ्मयातून इतस्ततः विखुरलेली आढळतात. अगदी सोप्या शब्दात मार्मिक अर्थ योगप्रभावादी ग्रंथात सुलभरीतीने सांगितल्यामुळे



(७८)

सामान्य वाचकाचीही योगाविषयीची जिज्ञासा थोडीफार तृप्त होते. आणि आधुनिक योगी योगासंबंधी मधून मधून जे काही बरेवाईट प्रतिपादन करतात, त्यातील सार काय, असार काय? तेही यावरून सहज कळून येते. योगविषयी अनेक गैरसमज दूर होतात. कुंडलिनी, चक्रे, यासंबंधीची खरी माहिती समजते. वेदांचे अपौरुषेयत्त्व, समाधीने सर्वज्ञत्व वगैरे बद्दलचे महाराजांचे विचार महत्वाचे आहेत. त्यांच्या अभ्यासामुळे जुन्या शास्त्रांचा अभ्यास करताना आवश्यक असलेली समन्वयाची दृष्टी अभ्यासकांना मिळते आणि पुढेही मिळेल. हे सर्वात महत्वाचे योगदान आहे.

ooo





(७९)

**संदर्भ- टीपा**

१)योगप्रभाव, पा.१३३. २)योगप्रभाव पा.५. ३) निदिध्यासन प्रकाश अ. ६, ओव्या ४६-५१, य. १, पा. १३३. ४)योगप्रभाव पा. ८ ५) पत्रे, यष्टी १२, पा. १५५ ६) साधुबोध पा. ५४, प्र. १२१. ७) य. १४, सांख्यसुरेंद्र, पा. २०४. ८) य.७,पत्र२७, पा.१९५. ९)योगप्रभाव, ओव्या २३-२४, य. १५, पा. ८. १०) योगप्रभाव, ओव्या ३४ य. १५, पा् ८३. ११) योगप्रभाव, ओव्या ६६, पा. ८५, १२) पत्र, य. १२, ८६. १३) पत्र . ७, पा. १९६. १४) पदांची गाथा, य. ९ उत्तरार्ध पा. ३५८. १५) योगप्रभाव, य. १५, पा. ९५-९६. १६) योगरहस्य पा. १९-२०-२१. १७) योगप्रभाव पा. २७७ १८) योगप्रभाव पा. २७९. १९) योगरहस्य, कुंडलिनी जगदंबा- ओवी ६-२३. २०) योगप्रभाव गद्य पा. २८५. २१) योगप्रभाव पा. १२७. २२) पत्र २७, य. ७, पा. १९३. २३) य. ७, पा. १९५. २४) य. ७, पा. १९५. २५) यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधी ही आठ योगची अंगे २६) ध्यानयोगदिवाकर अ. १, ओव्या ७-१४, २७) हिरण्ययोग अ. ४, ओवी ५६. २८) आदिष्टवान् यथा स्वप्ने रामरक्षामियां हरः । तथा लिखितवान् प्राप्तः प्रबुद्धबुधकौशिकः ।। २९) हिरण्ययोग अ. ४ ओवी ६५. ३०) हिरण्ययोग अ. ३ ओवी २४-२५. ३१) हिरण्ययोग अ. ४, ओवी ९१. ३२) योगप्रभाव पा. २३. ३३) योगप्रभाव पा. २४. ३५) येथे समाधिशब्दार्थ । धातृध्येयैक्य परमार्थ । की जीवेश्वरभेद समाप्त । व्युत्थानीहि जयाचा ।।६४।। ऐसे आधिकारिक । ज्ञानी भगवदुपासक । भक्तिवांचूनी दृष्ट दुःख । ज्ञानीही भोगिती ।।६५।। गीतासंगती य १, पा. ८५. ३६) प्रियलीलामहोत्सव आगनविलास अ. ६, य. ३, पा. ८४. ३७) पुत्रादिरूपा गौणीभक्ती । विरहिणीरूपा परमप्रीती । ही नारदोय भक्ती । महावाक्यार्थी स्थित असे ।।६४।। भक्तिपदतीर्थामृत अ. १. ३८) हे दोन्ही प्रमाणवचन । ताटस्थ्य निषेधिती पूर्ण । ते जावया कारण । भक्तिसंपन्न अन्वये ।।३।। तेचि उठलिया वृत्ती । जी रूपमयवृत्ती । ती ब्रह्मरूप अनध्यस्ती । विवर्ती सांपडे ।। ध्यानयोगदिवाकर, य १, पा. ७५. ३९) पत्र १०, य. १, पा. ५७. ४०) योगप्रभाव पा. ४५१-४५६. ४१) समाहितात्मनो । ब्रह्मन बह्मणः परमेष्ठिनः हृद्याकाशादभून्ना दो वृत्तिरोधाद्विभाव्यते ।।३७।। ततो भूत् त्रिवृत् ओंकारो यो व्यक्तप्रभवः स्वराट् । यत्तल्लिंगं भगवतो ब्रह्मणः परमात्मनः ।। ३८।। स्वघाम्नो ब्रह्मणः साक्षात् वाचकः परमात्मनः स सर्वमंत्रोपनिधद्वेदबीजं सनातनम् ।।४१।। ततो क्षरसमाम्नायमसृजद् भगवानजः ।।४३।। तेनासौ चतुरोवेदांश्चतुर्भिर्वदनैर्विभुः ... ।।४४।। भागवत. ४२) योगप्रभाव पा.



(८०)

७१. ४३) ..... जो परमेश्वर हृदयनायक । तो अनाहत नादीं सम्यक । उपजवी श्रुती ।।४३३।। तो प्रणव एक वेदू । तत्पर त्वद्गतसमष्टिस्वप्नलोकसंबंधू । स्वाधिष्ठानचक्री ब्रह्मा विनोदू । चारी वेद जे सांगे ।।४३४।। तेचि ब्रह्मदेवाच्या मुखे करून । बोलिजे चतुर्वेद निर्माण । किंवा कुंभक करताक्षणी ब्रह्मयाचे ध्यान । हृःदयीं बोलिले योगशास्त्री ।।४३५।। तेथ जे अनाहतनादाची स्थिती । सहावे अध्यायीं तात सांगती । तेथ जी होय शब्दोत्पत्ती । त्या जाण श्रुती तव हृदयीं ।।४३६।। तूंचि तयाचां वक्ता व्यास । परी हा अवघा त्वत्समष्टच्चंश । तूं एक आपणास । देह मानिसी म्हणोनी ।।४३७।। ते ४४१ संप्रदायसुरतरू, अ. ८, पा. २७३. ४४) योगप्रभाव ३८. ४५) प्रियलीलामहोत्सव अ. ७, य. ३, पा. ८८. ४६) योगप्रभाव ओव्या १०९-११८, य. १५, पा. ८८. ४७) उपायासी जरी विकल्पता । तरी फळी आहे परमसाम्यता । यालागी ईश्वरराधना गौणता । शंकता नये ।।१०९।। रोगी बैसो न शके उठोनी । तरी जीवन पाजावे आन कोणी । तेणे काय तृष्णाहरणी । न्यूनता घटे ।।११०।। तैसा निजप्रयत्नी जो असमर्थ । निर्गुणी न प्रवेशे ज्याचे चित्त । तयासी 'वा' शब्दे विकल्पित । ईश्वराराधन बोलिले मुनी ।।१११।। (योगप्रभाव, य. १५, पा. ८८) ४८) य. १४, पा. ६५. ४९) य. १४, पा. १०७. ५०) य. १४, पा. १०६. ५१) म्हणोनी निजात्मेश्वराराधान । हे करणे लागे प्रयत्ने करून । याचिलागी योगसाधन । प्रथम बोलिले सूत्रभाष्यी ।।१०५।। परी विरक्ती असोनी । अधीर दीन अंतःकरणी । तो आत्मभिन्न परेश मानोनी । प्राणिधान करीतै योगे पावे ।।१०६।। पा. ८८ योगप्रभाव य. १५, अ. २ ५२) योगप्रभाव पा. ६०-६१. ५३) निदि. प्रकाश अ. ६ ओव्या २७-४१, य. १, पा. १२६ ५४) योगिनामपि सर्वेषां मद्गतेनान्तरात्मना । श्रद्धावान् भजते यो मां स मे युक्ततमो मतः ।। गीता अ. ६. ५५) रुक्मिणीपत्रिका अ. ४, ओव्या ६०-७५, य. १, पा. १०९-११०. ५६) स्त्रीगीत ५८९ य. ४, पा. ५८.५७) योगमार्गाने जाणावे निर्गुण । रसाने सगुण भोगावे की ।।१।। ज्ञान ते प्रत्यक्ष, प्रत्यभिज्ञा भक्ती । श्रोतृवक्तृचित्ती रसयोग ।।३।। योगाने स्तब्धता, रसाने सगद्गज्ञानप्रेम शुद्धकृष्ण-ब्रह्मी ।।४।। अभंग ८६६, य. २, पू. पा. १८६. ५८) प्रियलीलामहोत्सव, य. १४, पा. ६५. ५९) य. १४, पा. ६५. ६०) प्रियलीलामहोत्सव ओव्या ४३६-४३८, य. १४, पा. १५७. ६१) ओव्या ४१-४२, य. १, पा. ३३. ६२) य. ३, पा. ८३. ६३) य. ३, पा. ८३. ६४) योगप्रभाव पा. ४२. ६५) प्रि. ली. अ. ७, ओवी ५९, य. ३, पा. ८८. ६६) य. २ ऊ, पा. ४८. पत्र १९, ६७) अलौ. व्याख्यानं पा. ७२. ६८) य. ४, स्त्रीगीत ६४०. ६९) य. ७, पा. २२.

**(यातील सर्व संदर्भ महाराजांच्या सर्व ग्रंथांच्या प्रथमावृत्तीतील आहेत.)**

**तक्ता -१**

***समाधी***

**काष्ठसमाधी** | **८.सहजसमाधी**

| **संप्रज्ञात** | **असंप्रज्ञात** | |
|---|---|---|
| १. वितर्क | ५. आपोआप व्युत्थान पावणारी | * निर्विकल्प |
| २. विचार | ६. दुसऱ्याकडून व्युत्थान पावणारी | * निर्बीज |
| ३. आनंद | ७. व्युत्थानरहित | * असंप्रज्ञात |
| ४. अस्मिता | | *व्युत्थानरहित |



***मौलिक विचार माला . २३***

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजांचा

# योग-विचार





रु.१०

*श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ दहीसाथ अमरावती

*डॉ. कृष्ण माधव घटाटे



**(तक्ता -३)**

**ईश्वरप्रणिधान**

| ***आत्म-अभिन्न** | ***आत्म-भिन्न** |
|---|---|
| *निर्गुण | *सगुण |
| *ज्ञानपूर्व-निर्गुण-उपासना | *ज्ञानपूर्व-सगुण-उपासना |
| ००० | *ज्ञानोत्तर-पराभक्ती |
| *व्यतिरेक-**'नेतिनेति'** | *अन्वय-**सर्वगन्धःसर्वरसः** |

*(योगप्रभाव-यष्टी.१५.ओ.८२-१८८)*

* शांकर अद्वैत आणि भक्तीचा पूर्ण समन्वय.
* भक्तिशास्त्राची निर्मिती.
* भक्तीच्या नव्या १६ प्रकारांची मांडणी.
* ज्ञान, उपासना आणि भक्तीतील भेदविवेचन.
* माधुर्यभक्तीवरील आक्षेपांचे निराकरण आणि तिच्या सर्वोच्चतेचे शास्त्रीय प्रतिपादन.
* नाममहात्म्य अर्थवाद आहे या आरोपाचे सविस्तर खंडन.
* योगी, ज्ञानी व भक्त यांच्यातील सूक्ष्म भेदांचे प्रतिपादन.
* समन्वयाच्या नऊ प्रकारांचे विवेचन.
* षड्दर्शने परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत याची नवीन संदर्भात मांडणी.
* सांख्य सेश्वर आहे याची सप्रमाण सिद्धी.
* आधुनिक योग्यांच्या कुण्डलिनी-चक्रे-नाड्यांसंबंधी चुकीच्या संकल्पनांचे खंडन.
* योगदर्शनात अनेक नवीन प्रक्रियांची निर्मिती.
* स्वप्नातून परमार्थ प्राप्तीची प्रक्रिया.
* आन्तर् आणि बाह्य समाधीचे नवे मूलगामी विवेचन.
* पूर्वमीमांसेचे काही अंशी खंडन व उत्तरमीमांसेसाठी तिचा उपयोग.
* उत्क्रांतिवाद, अणुवाद, अज्ञेयवाद, संशयवाद वगैरे पाश्चात्य तत्त्वज्ञानांची भारतीय सिद्धांताशी तुलना आणि मूल्यमापन.



विश्वास ठेवावा; याचे मार्गदर्शन.
* ''आर्य वंश नाही, आर्य बाहेरून आले नाहीत, शूद्र वर्ण हा आर्यांचाच भाग आहे'' या ऐतिहासिक सत्याचे मुद्देसूद प्रतिपादन : उत्तरधृवीय मताचा परामर्श.
* ''तीन हजार वर्षापूर्वी आर्य संस्कृती विश्वव्यापक होती'' या ऐतिहासिक सिद्धान्ताची पुनर्स्थापना.
* डार्विन, स्पेन्सर, ॲनीबेझंट वगैरेंच्या उत्क्रांतिवादाचे खंडन.
* सुधारणा आणि बहुमत यांचे संबंधी परखड विचार.
* शिक्षणासंबंधी मूलभूत विचार.
* प्राचीन व अर्वाचीन संगीताची तुलना, भातखंडेंचे खंडन व तात्त्विक प्रश्नांचा उहापोह.
* प्राचीन सूत्र कायम ठेवून नवीन साहित्यशास्त्राची निर्मिती.
* ''प्रक्षिप्त आणि भाषाभिन्नतेवरून लेखकभिन्नता'' हे आधुनिक संकेत संत-साहित्य / आर्ष-वाङ्मयाला लागू पडत नाहीत याचे स्वतःच्या उदाहरणावरून प्रतिपादन.
* कौटुंबिक व सामाजिक संबंधात प्रश्नोत्तर रूपाने मार्गदर्शन.
* मुलांसाठी उपदेश. * स्त्रीगीतांची निर्मिती.
* लोकगीतातून समाजप्रबोधन.
* नवीन १२३ मात्रावृत्तांची रचना.
* नवीन लघुलिपीची (सांकेतिकलिपी) निर्मिती.
* नवीन 'नावंग' भाषेची निर्मिती.
* नवीन व्याकरण सूत्रे.
* आत्मचरित्र लेखन. * नाटक लेखन. * [illegible] आख्यानांची



* नीतिशास्त्रातील युरोपियन मतांचे खंडन. त्यांचा भारतीय नीतीशी वेगळ्या रीतीने समन्वय आणि दैनंदिन सदाचाराचा उपदेश.
* पाश्चात्य आणि भारतीय मानसशास्त्रांशी तुलना.
* ॲलोपॅथी व आयुर्वेदाची तुलना आणि मानसायुर्वेदाची निर्मिती.
* इस्लाम, ईसाई, पारशी, बौद्ध, जैन, वगैरे सर्व वैदिक धर्माच्या शाखा आहेत या सिद्धान्ताचे प्रमाणपुरस्सर शास्त्रशुद्ध विवेचन.
* वर्णाश्रम व्यवस्थेचे मूल्यमापन.
* ब्राह्मण-ब्रह्मणेतरवाद आणि आर्य-अनार्य वादांसंबंधी तौलनिक विवेचन.
* बुवाबाजीचा दंभस्फोट.
* धर्मसंकर, धर्मसुधारणा आणि धर्मसमन्वय यातील भेद विवेचन.
* वेदांवर आणि पुराणांवर समन्वयात्मक सूत्रग्रंथांची रचना. तत्त्वज्ञानांचे मूळ स्त्रोत असल्याचे युक्तिसिद्ध प्रतिपादन.
* न्याय वैशेषिकातून प्राचीन आर्यांचे भौतिक विज्ञान कसे विकसित करावे, याचे मार्गदर्शन.
* मनोविज्ञान, काव्यशास्त्र, संगीत, आयुर्वेद वगैरे शास्त्रांची षड्दर्शनानुसार प्रस्तुती.
* इतिहास कोणी कसा लिहावा, आणि कोणत्या इतिहासावर



रचना.
* खेळातून परमार्थप्राप्तीची प्रक्रिया : मोक्षपट.
* संस्कृत, हिंदी, मराठी, वऱ्हाडी व व्रजभाषेत एकूण लहानमोठ्या १३९ ग्रंथांची रचना.
* पत्रे-११८ *अभंग-२०९९, *पदे-२२५२, *गीत-१२५०,
* श्लोक– १०००,
* ओव्या - २३०००, *एकूण पृष्ठे ६०००.

बालपणी नवव्या महिन्यात नेत्रहीन झालेल्या महाराजांच्या केवळ ३४ वर्षाच्या अल्पायुष्यात अनेक ज्ञानशाखांना कवेत घेणाऱ्या योगदानाचा विचार केला असता- अल्पवयात अजोड कार्य करणाऱ्या पूज्यपाद श्री आद्यशंकराचार्य व श्रीज्ञानेश्वर महाराज यांचीच आठवण येते आणि भारतातील महर्षी भगवान् श्रीव्यासांच्या सर्वस्पर्शी ज्ञानपरंपरेचा स्त्रोत अखंड असल्याची जाणीव होते. ०००

## श्रीगुलाबरावमहाराजांचे कार्य

*शांकर अद्वैत आणि भक्तीचा पूर्ण समन्वय. *भक्तिशास्त्राची निर्मिती. *भक्तीच्या नव्या १६ प्रकारांची मांडणी. *ज्ञान, उपासना आणि भक्तीतील भेदविवेचन. *माधुर्यभक्तीवरील आक्षेपांचे निराकरण आणि तिच्या सर्वोच्चतेचे शास्त्रीय प्रतिपादन. *नाममहात्म्य अर्थवाद आहे या आरोपाचे सविस्तर खंडन. *योगी, ज्ञानी व भक्त यांच्यातील सूक्ष्म भेदांचे प्रतिपादन. *समन्वयाच्या नऊ प्रकारांचे विवेचन. *षड्दर्शने परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत याची नवीन संदर्भात मांडणी. *सांख्य सेश्वर आहे याची सप्रमाण सिद्धी. *आधुनिक योग्यांच्या कुण्डलिनी-चक्रे-नाड्यांसंबंधी चुकीच्या संकल्पनांचे खंडन. *योगदर्शनात अनेक नवीन प्रक्रियांची निर्मिती. *स्वप्नातून परमार्थ प्राप्तीची प्रक्रिया. *आन्तर् आणि बाह्य समाधीचे नवे मूलगामी विवेचन. *पूर्वमीमांसेचे काही अंशी खंडन व उत्तरमीमांसेसाठी तिचा उपयोग. *उत्क्रांतिवाद, अणुवाद, अज्ञेयवाद, संशयवाद वगैरे पाश्चात्य तत्त्वज्ञानांची भारतीय सिद्धांताशी तुलना आणि मूल्यमापन. *नीतिशास्त्रातील युरोपियन मतांचे खंडन.त्यांचा भारतीय नीतीशी वेगळ्या रीतीने समन्वय आणि दैनंदिन सदाचाराचा उपदेश. *पाश्चात्य आणि भारतीय मानस



शास्त्रांशी तुलना. *ॲलोपॅथी व आयुर्वेदाची तुलना आणि मानसायुर्वेदाची निर्मिती. *इस्लाम, ईसाई, पारशी, बौद्ध, जैन, वगैरे सर्व वैदिक धर्माच्या शाखा आहेत या सिद्धान्ताचे प्रमाणपुरस्सर शास्त्रशुद्ध विवेचन. *वर्णाश्रम व्यवस्थेचे मूल्यमापन. *ब्राह्मण-ब्रह्मणेतरवाद आणि आर्य-अनार्य वादांसंबंधी तौलनिक विवेचन. *बुवाबाजीचा दंभस्फोट. *धर्मसंकर, धर्मसुधारणा आणि धर्मसमन्वय यातील भेद विवेचन. *वेदांवर आणि पुराणांवर समन्वयात्मक सूत्रग्रंथांची रचना.तत्त्वज्ञानांचे मूळ स्रोत असल्याचे युक्तिसिद्ध प्रतिपादन. *न्याय वैशेषिकातून प्राचीन आर्यांचे भौतिक विज्ञान कसे विकसित करावे, याचे मार्गदर्शन. *मनोविज्ञान, काव्यशास्त्र, संगीत, आयुर्वेद वगैरे शास्त्रांची षड्दर्शनानुसार प्रस्तुती. *इतिहास कोणी कसा लिहावा, आणि कोणत्या इतिहासावर विश्वास ठेवावा; याचे मार्गदर्शन. *''आर्य वंश नाही, आर्य बाहेरून आले नाहीत, शूद्र वर्ण हा आर्यांचाच भाग आहे'' या ऐतिहासिक सत्याचे मुद्देसूद प्रतिपादन : उत्तरधृवीय मताचा परामर्श. ''तीन हजार वर्षापूर्वी आर्य संस्कृती विश्वव्यापक होती'' या ऐतिहासिक सिद्धान्ताची पुनर्स्थापना. *डार्विन, स्पेन्सर, ॲनीबेझंट वगैरेंच्या उत्क्रांतिवादाचे खंडन. *सुधारणा आणि बहुमत यांचे संबंधी परखड विचार. *शिक्षणासंबंधी मूलभूत विचार. *प्राचीन व अर्वाचीन संगीताची



तुलना, भातखंडेंचे खंडन व तात्त्विक प्रश्नांचा उहापोह. *प्राचीन सूत्र कायम ठेवून नवीन साहित्यशास्त्राची निर्मिती. *''प्रक्षिप्त आणि भाषाभिन्नतेवरून लेखकभिन्नता'' हे आधुनिक संकेत संत-साहित्य / आर्ष-वाङ्मयाला लागू पडत नाहीत याचे स्वतःच्या उदाहरणावरून प्रतिपादन. *कौटुंबिक व सामाजिक संबंधात प्रश्नोत्तर रूपाने मार्गदर्शन. *मुलांसाठी उपदेश. *स्त्रीगीतांची निर्मिती. *लोकगीतातून समाजप्रबोधन. *नवीन १२३ मात्रावृत्तांची रचना. *नवीन लघुलिपीची (सांकेतिकलिपी) निर्मिती. *नवीन 'नावंग' भाषेची निर्मिती. *नवीन व्याकरण सूत्रे. *आत्मचरित्र लेखन. *नाटक लेखन. *१७ आख्यानांची रचना. *खेळातून परमार्थप्राप्तीची प्रक्रिया : मोक्षपट. *संस्कृत, हिंदी, मराठी, वऱ्हाडी व ब्रजभाषेत एकूण लहानमोठ्या १३९ ग्रंथांची रचना. *पत्रे-११८ *अभंग-२०९९, *पदे-२२५२, *गीत-१२५०, *श्लोक – १०००, *ओव्या – २३०००, *एकूण पृष्ठे ६०००.

बालपणी नवव्या महिन्यात नेत्रहीन झालेल्या महाराजांच्या केवळ ३४ वर्षाच्या अल्पायुष्यात अनेक ज्ञानशाखांना कवेत घेणाऱ्या योगदानाचा विचार केला असता- अल्पवयात अजोड कार्य करणाऱ्या पूज्यपाद श्री आद्यशंकराचार्य व श्रीज्ञानेश्वर महाराज यांचीच आठवण येते आणि भारतातील महर्षी भगवान् श्रीव्यासांच्या सर्वस्पर्शी ज्ञानपरंपरेचा स्रोत अखंड असल्याची जाणीव होते. ०००

This document was created with Win2PDF available at http://www.win2pdf.com.
The unregistered version of Win2PDF is for evaluation or non-commercial use only.
This page will not be added after purchasing Win2PDF.